# कायद्याची ओळख



वरिष्ठ नागरिक, अपंग
तसेच एचआयव्ही पिडीत संबंधित अधिकार



अनुसूचित जाती/जमाती/आदिवासींचे अधिकार



पंचायत राज्य

# आभार

विधी व न्याय विभाग, मंत्रालय भारत सरकार व यु.एन.डी.पी. यांनी 'कानुन को जाने' हया हिंदी भाषेत प्रकाशित करण्यात आलेल्या पुस्तकाचे, मराठी भाषेत रुपांतर करुन प्रकाशित करण्याची परवानगी दिलेली आहे. (पत्र क्र. डी.ओ. क्र. AZJ/IEC diseem/01/12 दिनांक १३/०४/२०१२) हयाबद्दल महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई विधी व न्याव मंत्रालय (न्याय विभाग) भारत सरकार व यु.एन.डी.पी. यांचे आभार मानीत आहे. तसेच, सदर पुस्तकातील कायदेविषयक माहिती सोप्या भाषेत, तळागाळातील लोकांना समजेल अशा उदाहरणासहीत लिहिलेली आहे ते माननीय लेखक महोदय श्री. संतोष कौशिक, श्री. संजय सिंह राठौर, श्री. विश्वास चव्हाण यांचे महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण शतश: ऋणी आहे. त्याचप्रमाणे सदर पुस्तक प्रकाशित करण्याकरीता ज्या ज्या लोकांचा सहभाग मिळाला त्या सर्वांचे महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणातर्फे आभार प्रदर्शित करीत आहोत.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई

---

विधी व न्याय विभाग, भारत सरकार तसेच यु.एन.डी.पी. यांच्या सहयोगाने न्याय हे तळागाळातील लोकांकरीता (Access to Justice for marginalised people) या योजनेच्या अंतर्गत लोकांमध्ये कायदेविषयक साक्षरता निर्माण करणेकरीता विविध कायदेविषयक माहिती असलेली पुस्तके विधी व न्याय विभाग, भारत सरकार व यु.एन.डी.पी. यांनी हींदी भाषेत प्रकाशित केली. सदर पुस्तकांचा मराठीत अनुवाद विधी व न्याय विभाग – (पत्र D.O. No. AZJ/IES diseem/01/12 दि. १३ एप्रिल २०१२) यांच्या परवानगीने महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे.

या पूस्तकाचा मुख्य उद्देश जनतेकरीता कायद्यात असलेल्या तरतूदींविषयी माहिती सोप्या मराठी भाषेत देऊन त्यांना विधी साक्षर करणे असा आहे, त्यामुळे या पुस्तकात समाविष्ट कायद्याबाबत माहितीच्या मजकूराच्या आधारे कायदेशीर प्रकरणासाठी उपयोग करणे अपेक्षित नाही. त्यासाठी मुळ शासकीय अधिनियमांचा व कायद्याच्या पुस्तकाचा उपयोग करावा तसेच या पूस्तकात दिलेली उदाहरणे किंवा गोष्टी या संपूर्णता काल्पनिक आहेत, त्यांचा कुठल्याही व्यक्तीशी अथवा घटनेशी संबंध नाही. हे पुस्तक खाजगी वितरणाकरिता प्रकाशित करण्यात आले.

# अनुक्रमणिका


- वरिष्ठ नागरिक, अपंग, एच.आय.व्ही. पिडीत संबंधी अधिकार ०१
  - — कायद्याच्या ताकदीची कथा ०२
  - — कायदे काय सांगतात ०७
  - — वरिष्ठ नागरिक कल्याणासंबंधी अधिकार १०
  - — वृध्दावस्था पेंशन योजना १३
  - — एडस् ओळखा १५
  - — मानसिक आरोग्य कायदा १९८७ २०
  - — विकलांगांचे / अपंगांचे कायदे व अधिकार २४

- अनुसुचित जाती / अनुसुचित जमाती तथा अदिवासींचे अधिकार २७
  - — अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती अधिनियम २८
  - — अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती तसेच वनवासींचे अधिकार २९
  - — अनुसुचित जाती/जमाती अत्याचार निमुलन अधिनियम १९९५ ३२
  - — अनुसुचित जमाती व इतर पारंपारीक वनवासी (वन अधिकारांना मान्यता) अधिनियम २००६ व नियमावली २००७ ३८

- पंचायत राज्य ४२
  - — कथा : पंचायतीपासुन मिळाली प्रेरणा ४३
  - — पंचायत राज्य : ७३ वे संशोधन ४९
  - — ग्रामसभा ५०
  - — समित्या ५५
  - — ग्रामकोष किंवा ग्रामपंचायत ५५
  - — ग्रामपंचायतीमध्ये पदांचे आरक्षण ५६
  - — ग्रामपंचायतीच्या समित्या ५९
  - — ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची साधने ६०
  - — जनपद आणि जिल्हा पंचायतीची बांधणी ६२
  - — पंचायत उपबंध (अनुसुचित विभागाच्या विस्तारावर पेसा अधिनियम १९९६) ६४
  - — मत्स्यव्यवसाय करणारे किंवा कचरा वेचणाऱ्यांचे अधिकार ६८

# वरिष्ठ नागरिक, अपंग, एच.आय.व्ही. पिडीत संबंधी अधिकार

# १. कायद्याच्या ताकदीची कथा



शिवा एक वर्षानंतर त्याच्या गावी परतला. गावी येण्याची आंतरिक ईच्छा त्याला अनेक वेळेस झाली. परंतु प्रत्येक वेळेस वेगवेगळया कारणाने ते शक्य झाले नाही. जेंव्हापासून त्याने वकिली सुरू केली, त्याला गावी येण्याची संधी मिळालीच नाही. गावामध्ये त्याचे भाऊ व वहिणी राहतात. आई–वडील बालपणीच वारल्याने भाऊ व वहिनीनेच शिक्षण देवून त्याला वकील बनविले. त्यामुळे शिवा भाऊ व वहिनी यांना अत्यंत आदरणीय व माता पित्या प्रमाणे मानतो.

शिवा घरी पोहचताच दादा व वहिनी खुप खुश झाले. त्यांनी शिवाला प्रेमाने कवटाळले व त्याला बसवून पाणी दिले. त्यानंतर त्यांचेमध्ये काही शहराच्या, तर काही गावच्या गोष्टी सुरू झाल्या. गावच्या गोष्टीत काही घरच्या तर काही बाहेरच्या गोष्टी झाल्या. गप्पा–गोष्टी करता करता संध्याकाळ कशी झाली हे त्यांना कळलेच नाही. त्यानंतर दादा म्हणाला, ''शिवा, तू थोडा आराम कर तोपर्यंत मी गाई–बैलांना चारा–पाणी देवून येतो.''

त्यानंतर दादा निघून गेला व वहिनी स्वयंपाकास लागली. त्यावेळेस शिवाला गुलाब काकांची आठवण आली. गुलाबकाका त्याचे शेजारी होते व त्यांनी लहानपणी शिवाला आपल्या अंगाखांद्यावर खेळविले होते. खरे सांगायचे तर शिवाला वकील बनविण्यात त्यांचा फार मोठा हातभार होता. ते कायम दादाला म्हणत असत, ''याला भरपूर शिक्षण दे, वकील बनव गावात एकतरी वकील असणे फार आवश्यक आहे.''



बऱ्याच वेळेस शिवाची फी देखील गुलाबकाकांनी भरली होती. त्यांचा स्वत:चा मुलगा फार शिकला नाही. सातवी पास झाल्यानंतर तो उनाडक्या करू लागला. शिवा गावी आल्यावर प्रत्येक वेळेस गुलाब काका त्याला भेटत असत. शिवाचा आवाज अंगणातून ऐकू आला की ते धावत येवून त्याला भेटत असत त्याचेबरोबर बसून खुप

गप्पा–गोष्टी करून त्याचे अभ्यासाची परिस्थिती देखील विचारत असत. मागचे वेळेस तर गुलाबकाका त्याला रस्त्यापर्यंत सोडावयास आले होते. गुलाबकाका शिवाला नेहमी म्हणत असत, "शिवा बेटा, आता तू वकील बनला आहेस त्यामुळे पैसे कमविण्याच्या नादात तू आपल्या काकाला विसरू नकोस."

आज गुलाबकाका धावत कसे आले नाहीत, काही अघटित तर घडलेले नाही, तसे होणार नाही. जर असे तसे काही घडले असते तर दादा–वहिनींनी त्याबद्दल त्याला जरूर सांगितले असते. शिवाचे मनाची चलबिचल वाढली व त्याने वहिनीना हाक मारली त्यामुळे वहिनी स्वयंपाक घरातून बाहेर आल्या. त्यांना शिवाने विचारले,'' वहिनी, आज गुलाबकाका का नाही आले? ते घरी नाहीत का?'' त्यावर वहिनी म्हणाल्या, ''काय सांगू भाऊजी, गुलाबकाका फार दुःखी आहेत व घरात रहात नाहीत'' ''घरात रहात नाहीत, मग कुठे राहतात?'' वहिनी उत्तरल्या गावाबाहेर एक पडिक जमिन आहे, त्यावर एक छोटी झोपडी टाकून ते राहतात. वय झाल्याने त्यांचे शरीर जर्जर झालेले आहे. त्या नालायक लालूने त्यांची सर्व जमिन–जायदाद आपल्या नावे करून घेतली आहे. या वयात ते काय करू शकतात? आता तर ते मजूरी करण्यासारखे देखील नाहीत. बऱ्याच वेळेस तर ते उपाशीच असतात. कधीतरी लालू त्याचे मुलामार्फत उरले–सुरलेले जेवण पाठवून देतो. तर काही वेळेस तुझे दादा लपून छपून त्यांना जेवण देऊन येतात". शिवाने विचारले, "लपून छपून जेवण देण्याचे कारण काय?" त्यावर वहिनी उत्तरल्या, "काय करणार, जर त्याबद्दल समजले तर लालूची पत्नी शिवीगाळ करते व लालू सुध्दा भांडायला उठतो."



हे सर्व ऐकल्यानंतर शिवाची सहनशक्ती संपली व तो ताडकन उठून उभा राहिला. वहिनींनी विचारले, ''भाऊजी काय झाले? कुठे निघालात?" त्यावर शिवा उत्तरला, ''गुलाब काकांकडे." त्यावर वहिनी म्हणाल्या, "बरं, ठिक आहे. जर तेथे निघालाच आहात तर मग सोबत थोडे जेवण घेवून जा."

मोडक्या झोपड्यात गुलाबकाका निपचित पडून होते. आत अंधार होता. मात्र बाहेर चांदणे पसरलेले होते. थोडाफार प्रकाश फटीतून आत जात होता. शिवाने बाहेरूनच आवाज दिला, ''काका"

गुलाबकाकांनी शिवाचा आवाज लगेचच ओळखला. उठण्याचा प्रयत्न करून ते म्हणाले, "अरे शिवा आलास का?" त्यांचा आवाज कापत होता. शिवा आत पोहचला व काकांच्या पाया पडून त्यांचे बाजूला बसला.

त्यानंतर काका स्वत:ला रोखू शकले नाहीत व हमसून–हमसून रडू लागले. त्यांचे अश्रु पुसत शिवा त्यांना म्हणाला, "काका, रडू नका, आता मी आलेलो आहे व सारे काही ठिक होईल. मला वहिणींनी सर्व सांगितलेले आहे. या नंतर मी आपल्याला कुठलाही त्रास होऊ देणार नाही. मी लालूला समजुन सांगण्याचा प्रयत्न करेन."



त्यावर काका उत्तरले, "बेटा तो काही समजून घेणार नाही उलट तो तुझा अपमान करेल, शिवीगाळी करेल?"

"जर तो समजणार नसेल तर मी त्याला न्यायालयात खेचेन." शिवा म्हणाला.

"न्यायालय! यामध्ये न्यायालय काय करणार आहे?" काकांनी आश्चर्याने विचारले.

शिवा उत्तरला, "काका, यामध्ये न्यायालय बरेच काही करू शकतात. कुणीही आपल्या म्हाताऱ्या आई–वडिलांना उपाशी मरण्यासाठी सोडू शकत नाही. तसा विशेष कायदा देखील आता अस्तित्वात आलेला आहे."




"काय? याकरिता देखील आता कायदा अस्तित्वात आलेला आहे?" शिवाजवळ सरकत काकांनी पुढे विचारले, ''बाळ जरा सांग बरे या कायद्यात काय आहे ते."

"काका, आई वडील व वरिष्ठ नागरिकांचे कल्याण व पालनपोषण अधिनियम, २००७ (The Maintenance and Welfare of Parents & Senior Citizens Act, 2007) तसेच कलम १२५, फौजदारी प्रक्रिया संहिता यानुसार तुम्हाला तुमच्या मुलाकडून स्वत:चे पालन–पोषण करिताची रक्कम पोटगी म्हणून मिळण्याचा कायदेशिर अधिकार आहे."

"अरे व्वा !" काका उद्‌गारले. "बेटा, या कायद्यात काय आहे ते मला व्यवस्थितपणे समजून सांग."

शिवा उत्तरला, "जे वरिष्ठ नागरिक स्वत:च्या कमाईने किंवा असलेल्या संपत्तीने स्वत:चे पालन पोषण करण्यास असमर्थ आहेत ते आपल्या मुलाकडून पोटगी मिळण्यासाठी अर्ज दाखल करू शकतात."

"त्यांना किती पोटगी मिळू शकते."



"ते सर्वस्वी मुलाचे उत्पन्नावर अवलंबून असते. त्याचे उत्पन्न व त्याच्या परिवाराचा खर्च हे विचारात घेऊनच न्यायालय पोटगीची रक्कम ठरवित असते."

"ही पोटगी मिळते कशी?"

"न्यायालयात प्रकरण दाखल केल्याने"

"न्यायालयाच्या निकालानंतर देखील जर पोटगी रक्कम मिळाली नाही, तर काय करायचे?"

"त्या परिस्थितीत न्यायालयाकडे पुन्हा अर्ज करावा लागतो"

"त्यामुळे काय होईल?"

"न्यायालय त्या व्यक्तीकडून रक्कम वसुली करिता वॉरंट जारी करेल"

"आणि तरी देखील त्याने रक्कम दिली नाही तर?"

"तर मग न्यायालय त्याला जेलची शिक्षा सुध्दा देवू शकते"

शिवाचा सल्ला ऐकुण काकांना बरे वाटले ते म्हणाले, "बाळ, तु तर मोठा वकील बनला आहेस. आज तू मला कायद्याचा एक मार्ग दाखवून दिलास खरा परंतु"

"परंतु काय काका?" शिवाने विचारले.

"आपल्याच मुलाला न्यायालयात खेचणे योग्य ठरेल का? लोक काय म्हणतील?" काकांनी चिंतातूरपणे विचारले.

"हे पहा काका, लोकांची चिंता करण्याचे कुठलेही कारण नाही. लालू तुमच्याशी जसे वागला ते योग्य होते का? त्यावेळेस त्याने आपले वागणे चूक की बरोबर याचा विचार केला होता का? लालूने त्यावेळेस लोक काय म्हणतील याचा विचार केला होता का? नाही ना. मग तुम्ही का त्याची इतकी चिंता करत आहात?"

"अरे बेटा, आता या वयात न्यायालयाची चक्कर"

"तुम्ही त्याची चिंता करून नका काका. तुम्हाला न्यायालयात चकरा माराव्या लागणार नाहीत. मी आधी लालूला समजविण्याचा पूर्ण प्रयत्न करतो आणि तरी देखील त्याने ऐकले नाही तर मग न्यायालयाचा मार्ग आहेच."

त्यावर दिर्घ उसासा सोडून काका म्हणाले, "ठीक आहे बाळ, जसे तुला योग्य वाटते तसे कर."

दुसरे दिवशी शिवा लालूला भेटला. त्यावेळेस शिवाने लालूला, आई—वडिल व वरिष्ठ नागरिकांचे कल्याण व पालनपोषण अधिनियम, २००७ व फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ च्या तरतुदी समजावून सांगितल्या. न्यायालय व जेलची धमकी दिली. त्यानंतर लालू म्हणाला, "हे बघ शिवा, मला न्यायालयात खेटे मारावयाचे नाहीत, तसेच मला जेलची हवा देखील खायची नाही. मला या सर्व गोष्टींपासून दूरच ठेवा."



या सर्व गोष्टी सुरू असताना लालूची पत्नी देखील घरातून बाहेर आली. सोबत तिचा मुलगा देखील होता.

शिवा म्हणाला, "लालू, न्यायालयापासून वाचायचे असेल तर, आपली चुक सुधार. जरा विचार करा तर कांकावर काय ओढवली असेल. तु येथे पोटभर खात पित आहेस आणि काका

तिकडे उपाशी व तहानलेल्या अवस्थेत आहेत. तुझा मुलगा देखील आता सहा वर्षाचा झाला आहे. त्याचे हातून तू कधी–कधी शिळे–पाके अन्न काकांना पाठवितोस. तुझ्या मुलाला सर्व काही दिसते व समझते. तुमच्या स्वत:च्या मुलाने जर तुम्हा दोघांना म्हातारपणी वाऱ्यावर सोडले तर मग काय कराल?"

"नाही शिवा नाही. असे म्हणून नकोस. प्रत्येक आई–बापाला वाटत असते की, म्हातारपणी त्यांच्या मुलांनी त्यांना सहारा द्यावा. आम्ही, काकांना बेसहारा सोडून फार मोठी चुक केली आहे."

"तर मग तु काकांना पोटगी देण्यास तयार आहेस का?" शिवाने विचारले.

त्यावर लालू उत्तरला ''नाही. आम्ही त्यांना पोटगी देऊ शकत नाही."

"काय म्हणालास तू ! ................." शिवा रागावून म्हणाला.

लालू शिवाच्या खांद्यावर हात ठेवित म्हणाला "शिवा, अरे ते माझे वडिल आहेत, कोणी परके नाहीत. फक्त पोटगी देऊन माझी चुक सुधारली जाणार नाही. म्हातारपणी सेवेची देखील गरज असते. त्युनसार मी त्यांना आणायला जात आहे. आता मी त्यांना घरीच ठेवणार आहे. त्यांची सेवा मी करणार आहे व त्यांना एकटे राहू देणार नाही" असे म्हणून लालू रडू लागला. त्याचे सोबत त्याची पत्नी देखील रडू लागली.

असे म्हटले जाते की, सकाळी वाट चुकलेला संध्याकाळी घरी आला तर त्याला चुकलेला म्हणत नाहीत. चला आता माता–पित्यांचे संरक्षण आणि पोटगीचे कायदया संदर्भाने तसेच वरिष्ठ नागरिकांचे कल्याणासाठीचे योजना संदर्भाने माहिती घेऊ या.



# २. कायदे काय सांगतात ?

## माता–पित्यांचे संरक्षण आणि पोटगीचा अधिकार



प्रश्न : पोटगी म्हणजे काय ?

उत्तर : माता–पिता आणि ज्येष्ठ नागरिकांचे अन्न, वस्त्र, निवारा आणि औषधे तसेच उपचार व देखभाल या करिताचे व्यवस्थेला "पोटगी" म्हणतात.

प्रश्न : वरिष्ठ नागरिक कोणाला म्हणतात?

उत्तर : ६० वर्षे वा अधिक वयाचे स्त्री–पुरूष जेष्ठ नागरिक म्हणून गणले जातात.

प्रश्न : अपत्ये म्हणून केवळ मुले गणली जातात का?

उत्तर : नाही. त्यामध्ये मुलगा व मुलगी दोघे येतात. एव्हढेच नाही तर मुला–मुलींची अपत्ये देखील त्यात धरली जातात.

प्रश्न : लहान मुलांकडून देखील पोटगी मागता येते का?

उत्तर : नाही. १८ वर्ष अगर त्याहून अधिक वय असणाऱ्यांकडूनच पोटगी मागता येते.

प्रश्न : आई–वडिल म्हणजे नेमके काय?

उत्तर : आई व वडिल हे दोघेही. ते जन्मदाते किंवा दत्तक घेणारे किंवा सावत्र देखील असून शकतात.

प्रश्न : आई–वडिल वरिष्ठ नागरिक असणे आवश्यक आहे का ?

उत्तर : नाही.

प्रश्न : वरिष्ठ नागरिकांचे कल्याण म्हणजे नेमके काय?



उत्तर : पोटगी व्यतिरिक्त वरिष्ठ नागरिकांचे आरोग्याची देखभाल त्यांचे मनोरंजन अथवा मन रमविण्यासाठी केंद्र बनविणे आणि आवश्यक त्या सर्व सोयी पुरविणे यालाच कल्याणाचे काम म्हटले जाते.

प्रश्न : आई–वडिलांच्या पोटगीकरीता दंडाधिकाऱ्यांच्याकडे अर्ज करता येतो का?

उत्तर : होय. नविन कायद्यात आई–वडिल व वरिष्ठ व्यक्तींकरीता जलद न्याय देण्याची व्यवस्था केलेली आहे.

प्रश्न : पोटगी करीता अर्ज कुठे आणि कसा केला जातो ?

उत्तर : प्रत्येक उप–विभागात (ब्लॉक) किंवा अनुविभागता एक किंवा अधिक पोटगी न्यायाधिकरण (ट्रिब्युनल) काम करतात. त्यांचेकडे अर्ज केला जाऊ शकतो.

प्रश्न : जर कुणी आई–वडिल अगर जेष्ठ नागरिक समर्थ नसेल तर काय ?

उत्तर : त्या परिस्थितीत त्याने ज्याला अधिकार दिला ती व्यक्ती अर्ज करू शकते किंवा कुठलीही संघटना अर्ज करू शकते किंवा पोटगी अधिनियमाची माहिती मिळाल्यावर स्वत: देखील कार्यवाही करू शकतात.

प्रश्न : यामध्ये आपसांत तडजोड होवू शकते का ?

उत्तर : सदरहू न्यायाधिकरण तडजोड करण्यास सांगेल. तडजोड अधिकारी आपसातील संबंध टिकविण्यासाठी प्रयत्न करेल. जर शांतीपूर्ण समझोता झाला तर न्यायाधिकरण त्याप्रमाणे आदेश करेल.

प्रश्न : पोटगी न्यायाधिकरण किती मासिक हप्ता मंजूर करू शकते?

उत्तर : रक्कम रूपये १०,०००/– पर्यंत मासिक हप्ता मंजूर करू शकते.

प्रश्न : पोटगी न्यायाधिकरणाचा संपर्काचा पत्ता काय आहे ?

उत्तर : जिल्हाधिकारी कार्यालयातील उप–विभागीय अधिकारी यांचे कार्यालयात पोटगी न्यायाधिकरणाचे काम चालते. तेथे पोटगी करिता अर्ज करता येतो.

प्रश्न : तहसिल किंवा उप मुख्यालयात तसा अर्ज करता येतो का ?

उत्तर : होय. ज्या तहसिल किंवा उप मुख्यालयात एस.डि.ओ. सिव्हील कार्यालयीन काम पाहतात, त्या कार्यालय / न्यायालयात प्रस्तुतचा अर्ज केला पाहिजे.

प्रश्न : पोटगी अर्जाचा नमुना कसा आहे?

उत्तर : प्रत्येक राज्य सरकार आपले नियम बनवून अर्जाचा नमुना तयार करतात.

प्रश्न : पोटगी अर्जाकरिता वकिलाची आवश्यकता आहे का ?

उत्तर : नाही. मात्र या कायद्यात वकिल नेमणूकीस कोणतीही मनाई नाही.

प्रश्न : म्हणजे वकिलांचे सहाय्य मिळणारच नाही काय?

उत्तर : मिळू शकते. अर्जानुसार दिवाणी चौकशी, आदेश व अपिल देखील होवू शकते. त्यामुळे वकिल नेमणे योग्य ठरते.

प्रश्न : मासिक भत्त्याचा आदेश रद्दबातल होवू शकतो किंवा त्यामध्ये बदल होवू शकतो का ?

उत्तर : होय. जर न्यायाधिकरणास समजले की, खोटी माहिती देवून आदेश मिळविलेला आहे किंवा एखाद्या गोष्टीबाबत चुक झालेचे निष्पन्न झाले किंवा भत्ता मिळणाऱ्याची परिस्थिती बदलली असेल म्हणजे तो स्वत:चे पालन पोषण करण्यास समर्थ असेल तर किंवा दिवाणी न्यायालयाने असा कुठलाही आदेश केला असेल ज्यामुळे भत्त्याचा आदेश परत घेणे किंवा



त्यामध्ये बदल करणे न्यायाधिकरण आवश्यक समजत असेल.



प्रश्न : न्यायाधिकरणाचे आदेशाची प्रत कशी मिळते ?

उत्तर : न्यायाधिकरण भत्ता व सुनावणीदरम्यान झालेला खर्च देण्याच्या आदेशाची प्रत आई–वडिलांना विना मोबदला (फुकट) देईल.

प्रश्न : जर मुलगा किंवा नातेवाईकाने पालन–पोषणाची ठरवून दिलेली रक्कम अदा केली नाही तरी काय ?

उत्तर : त्या परिस्थितीत न्यायाधिकरण आपले आदेशावर अंमल करण्यासाठी स्वत: फौजदारी न्यायालयाचे अधिकाराचा वापर करेल.

प्रश्न : ज्यावेळेस फौजदारी न्यायालयाकडून भत्त्याचा आदेश मिळू शकतो त्यावेळेस न्यायाधिकरण आदेश देऊ शकते काय?आणि दोन्ही ठिकाणाहून आदेश मिळू शकतात का?

उत्तर : नाही. दोघांपैकी कुठल्या तरी एका ठिकाणाहून भत्ता घेण्याची कार्यवाही केली जाऊ शकते.

प्रश्न : भत्त्याची रक्कम कधी आणि किती दिवसांत मिळते ?

उत्तर : संतती अगर नातेवाईक यांनी आदेशानंतर ३० दिवसाचे आत रक्कम भरणे आवश्यक असेल.

प्रश्न : रक्कम कुठे जमा करावी लागते?

उत्तर : जेथे रक्कम देण्याचा अगर जमा करण्याचे आदेशात लिहीलेले आहे.

प्रश्न : जर दंडाधिकारी कोर्टात भत्त्यासाठी पुर्वीपासूनच अर्ज प्रलंबित असेल तर काय?

उत्तर : दंडाधिकारी कोर्टातून अर्ज मागे घेऊन तो अर्ज पोटगी न्यायाधिकरणाकडे दाखल करता येतो.

प्रश्न : भत्त्याच्या रकमेवर व्याज मिळू शकते का?

उत्तर : होय. आदेशाची तारीख किंवा त्या नंतरच्या कुठल्याही तारखेपासून व्याज देता येते

प्रश्न : व्याजाचा दर किती असतो ?

उत्तर : पाच टक्क्यापेक्षा कमी नाही व अठरा टक्क्यापेक्षा जास्त नसेल इतका व्याजाचा दर असतो.

प्रश्न : न्यायाधिकरणाचे आदेशावर अपिल करता येते का?

उत्तर : होय. प्रत्येक जिल्ह्यात अपिल प्राधिकरण अस्तित्वात आहे.

प्रश्न : अपिल किती दिवसात करता येते?

उत्तर : न्यायाधिकरणाचे आदेशानंतर साठ दिवसाचे आत अपिल करता येते.

प्रश्न : साठ दिवसानंतर अपिल ऐकले जाणार नाही का?

उत्तर : उशिराबद्दलचे संयुक्तिक कारण अपिल प्राधिकरणास पटल्यास विलंबाची माफी केली जाईल.

प्रश्न : अपिल दाखल केल्यानंतर देखील भत्ता द्यावाच लागेल का?

उत्तर : होय. अपिलाची सुनावणी व निकाल होई पावेतो मासिक भत्ता द्यावाच लागेल. सुनावणी दरम्यान अपिल प्राधिकरण त्या संदर्भाने आदेश करेल मात्र अपिलाचा निर्णय एक महिन्यात द्यावा लागेल.

प्रश्न : अपिलातील आदेशाविरूध्द अपिल करता येईल का ?

उत्तर : नाही. दुसरे अपिल करता येणार नाही.

प्रश्न : पोटगी न्यायाधिकरण व अपिल प्राधिकरणासमोर वकिल युक्तिवाद करू शकतील का ?

उत्तर : नाही. या दोन्ही ठिकाणी वकिल युक्तिवाद करू शकणार नाहीत. मात्र दंडाधिकारी कोर्टात पोटगी प्रकरणात वकिल आवश्यक आहेत.

प्रश्न : आई–वडिल तथा जेष्ठ नागरिक न्यायाधिकरणासमोर स्वत: युक्तिवाद करू शकला नाही तर काय ?

उत्तर : त्या करिता सरकारने पालन–पोषण अधिकारी नियुक्त केलेले आहेत. जर अर्जदाराने मागितले तर तो अधिकारी न्यायाधिकरणासमोर अर्जानुसार युक्तिवाद करेल.


## ३.वरिष्ठ नागरिकांचे कल्याणासंबंधी अधिकार

प्रश्न : वृध्दांसाठी काही कल्याणाच्या योजना आहेत का?

उत्तर :
- निराधार राहणाऱ्या वृद्धाकरीता प्रत्येक जिल्ह्यात एक वृद्धाश्रम बनणार आहे.
- एका वृद्धाश्रमात दिडशे वरिष्ठ नागरिक ठेवले जाणार आहेत.
- म्हाताऱ्या लोकांना सहजपणे पोहचता येईल अशा ठिकाणी सदरहू वृद्धाश्रम असणार आहेत.
- वृद्धाश्रमात त्यांनाच ठेवले जाईल ज्यांचेकडे स्वत:चे पालन–पोषण करण्याची पुरेशी साधन उपलब्ध नाहीत व जे खुप गरीब आहेत.

प्रश्न : वृद्धाश्रमात काय व्यवस्था असते?

उत्तर :
- तेथे म्हाताऱ्या लोकांच्या मनोरंजनाची व्यवस्था असते. त्यामुळे ते तेथे प्रसन्न राहू शकतील.
- त्या ठिकाणी त्यांच्या आरोग्याची देखभाल करण्यासाठी देखील आवश्यक ती व्यवस्था असेल.



प्रश्न : कुणीही वृद्धास ईस्पितळात भरती करु

शकते का ?

उत्तर : होय, तब्येत बिघडली असले तर किंवा मृत्यु येऊ शकेल असा कुठलाही आजार झाला तर अशा वरिष्ठ नागरिकांकरीता सरकारी मदतीवर चालणाऱ्या दवाखान्यात पलंगांची एक स्वतंत्र रांग लावली जाते. त्यामुळे ते आपसात गप्पा गोष्टी करू शकतील त्याचप्रमाणे वृद्धावस्थेत होणाऱ्या रोगांवर त्या रोगाचे तज्ञ डॉक्टर देखभाल करतात.

प्रश्न : वरिष्ठ नागरिकांचे संपत्तीची रक्षा कशी होणार आहे व त्यांचे जिवन रक्षना संबंधी काय उपाय आहेत?

उत्तर : या कामाकरिता सरकारी अधिकारी, पोलीस आणि न्यायालयाचे अधिकारी नियुक्त केले जातील. ते वरिष्ठ नागरिकांचे कल्याणाचे कामात कुठलाही ढिलेपणा किंवा निष्काळजीपणा तर केला जात नाही ना तसेच त्यांची प्रकरणे वेळेवर निकाली काढली जात आहेत किंवा नाहीत हे पाहतील.



प्रश्न : वरिष्ठ नागरिक, माता–पिता आणि म्हाताऱ्या लोकांना त्यांचे कल्याणाकरीता काय उपाय केले जात आहेत याची माहिती कशी मिळेल?

उत्तर : या उपायाबद्दल पोस्टर स्वरूपाने, टि.व्ही./दुरदर्शन तसेच रेडिओवर प्रचार /प्रसार करून सांगितले जाते. तसेच हॅन्डबिले वाटून किंवा वर्तमान पत्रातून वगैर प्रचार केला जातो.

प्रश्न : जर मुलांनी / नातेवाईकांनी संपत्ती आपले नावे करून घेतली तर काय?

उत्तर : जर कुणी वरिष्ठ नागरिकाने आपली मुले अगर नातेवाईक यांचे म्हणणे ऐकून आपली संपत्ती त्यांचे नावे या शर्तीवर लिहून दिली की, मुले अगर नातेवाईक त्यांना रोज लागणाऱ्या सुविधा पुरवतील व त्यांच्या गरजा पूर्ण करतील. मात्र, नंतर त्या मुलांनी अगर नातेवाईकांनी अशा सुविधा पुरविल्या नाहीत. किंवा शरीराला आवश्यक गोष्टी दिल्या नाही अथवा देण्यास नकार दिला तर कायद्याने असे मानले जाईल की, वरिष्ठ नागरिकास फसवून किंवा त्याचेवर दबाव आणुन अथवा धमकी देऊन किंवा अनुचित प्रभाव टाकून मुले अथवा नातेवाईकांनी संपत्ती आपले नांवे करून घेतली होती.

प्रश्न : ती संपत्ती वरिष्ठ नागरिकास परत मिळेल का?

उत्तर : होय, जर त्याची इच्छा असेल तर संपत्तीवर लागलेल्या मुलाचे अगर नातेवाईकाचे नाव काढून टाकले जाईल.

प्रश्न : जर कुणाही वरिष्ठ नागरिकास कुठल्याही मिळकतीमधून पोटगी मिळण्याचा अधिकार असेल व ती मिळकत दुसऱ्या कुणाच्या नांवे करून दिली तर काय होईल?

उत्तर : ज्या व्यक्तीस ती मिळकत मिळालेली आहे, त्या व्यक्तीकडून सदरहू वरिष्ठ नागरिकास पोटगी मिळण्याचा अधिकार आहे. मात्र असे तेव्हाच घडेल जेव्हा मिळकत मिळणाऱ्यास याची माहिती असेल की, ज्या संपत्ती मधून पोटगी दिली जाणार होती ती संपत्ती त्याचेवर कृपा करून त्याला दिली गेलेली आहे. ज्याला संपत्ती मिळाली त्याने रक्कम देवून संपत्ती घेतली असेल व घेणाऱ्याला जर हे माहिती नसेल की सदरहू संपत्ती मधून पोटगीचा अधिकार होता व आहे तर त्या वरिष्ठ नागरिकास संपत्ती घेणाऱ्याकडून पोटगी मिळण्याचा अधिकार नसेल.

प्रश्न : उपलब्ध अधिकाराचा वापर करण्यास वरिष्ठ नागरिक सक्षम नसेल व तो अधिकार त्याला लागू करायचा असेल तर तो कशा प्रकारे लागू करता येईल?

उत्तर : त्या परिस्थितीत त्याचेमार्फत एखादी संघटना कार्यवाही करेल.

प्रश्न : जर मुले किंवा नातेवाईकांनी आई–वडील अगर वरिष्ठ नागरिकाची देखभाल अगर संरक्षण करणे सोडून दिले आणि त्यांचेपासून सुटका मिळावी म्हणून त्याला कुठेतरी सोडून दिले तर अशी मुले अगर नातेवाईकास शिक्षा होते का?

उत्तर : आई–वडील अगर वरिष्ठ नागरिकांचे कल्याण व पालनपोषण अधिनियम, २००७ चे कलम २४ नुसार, अशी मुले अगर नातेवाईकांना तीन महिन्यांपर्यंत तुरूंगवासाची शिक्षा होऊ शकते.

प्रश्न : त्याबद्दल दंड होऊ शकतो का?

उत्तर : होय, तुरूंगवासाची शिक्षा किंवा रक्कम रूपये ५०००/– पर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

प्रश्न : हे प्रकरण कोठे चालते? त्यामध्ये जामिन मिळतो का?

उत्तर : अशी प्रकरणे दंडाधिकारींच्या कोर्टात चालतात व पोलिस अशा प्रकरणात दोषारोपपत्र देखील दाखल करून शकतात मात्र गुन्हा जामिनपात्र असल्याने जामिन अधिकार म्हणून प्रत्येक प्रकरणात मिळतो.

प्रश्न : या प्रकरणांची सुनावणी अनेक वर्षे चालते का?

उत्तर : नाही. अशा प्रकरणात दंडाधिकारींच्या कोर्टाने कमीतकमी कालावधीत सुनावणी होऊन निर्णय देणे बंधनकारक असते.

# ४. वृद्धावस्था पेन्शन योजना

प्रश्न : वृद्धावस्था पेन्शन योजना काय आहे?

उत्तर : सामाजिक सुरक्षा योजने अंतर्गत मोडणारी ही एक योजना आहे.


प्रश्न : या योजनेचा उद्देश काय आहे?

उत्तर : निराधार लोकांना जीवन व्यतीत करण्यासाठी पैशाचे स्वरूपात मदत करणे हा या योजनेचा उद्देश आहे.

प्रश्न : ही पेन्शन कशी मिळू शकते?

उत्तर : त्या करीता योजनेच्या लाभार्थ्याने तो रहात असलेल्या भागातील ग्रामपंचायतीकडे अर्ज करावा लागतो.

प्रश्न : शहरी भागात रहाणाऱ्या वृध्दांनी त्यासाठी कोठे अर्ज करावा?



उत्तर : त्याकरिता त्यांनी ते ज्या महानगरपालिका, नगरपालिका, नगर परिषद क्षेत्रात राहतात तेथे अर्ज करावा.

प्रश्न : त्या अर्जासाठी कुठलीही फी आवश्यक आहे का?

उत्तर : नाही, तो अर्ज मोफत मिळतो.

प्रश्न : योजनेच्या लाभार्थ्यांची निवड कोण करते?

उत्तर : गावांमध्ये ग्रामसभा व शहरांमध्ये त्या गावची संस्था लाभार्थ्यांची निवड करते.

प्रश्न : ग्रामीण भागात अर्जाची छाननी कोण करते ?

उत्तर : ग्राम पंचायत किंवा ग्रामसभा अर्जाची छाननी करून सात दिवसांत आपली शिफारस पंचायतीत पाठविते.

प्रश्न : त्यावर पंचायत काय कार्यवाही करते?



उत्तर : शिफारशीवर पंचायत आपले बैठकीत विचार करते आणि ६० दिवसाचे आत प्रस्तावाचा स्विकार अगर अस्विकार करते.

प्रश्न : निराधार, विधवा किंवा पतीने सोडून दिलेल्या स्त्रियांना देखील सहायता मिळते का?

उत्तर : होय. मात्र अशा महिलांचे अर्ज पंचायत किंवा नगर परिषद जिल्हा समितीकडे

पाठविते. सदरहू जिल्हा समिती जिल्हयाचे कलेक्टर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पंचायत किंवा सामाजिक न्याय विभागाचे संयुक्त किंवा उप संचालक यांचे बैठकीत पेन्शन प्रस्तावाचा स्विकार अगर अस्विकार करते.

प्रश्न : दरमहा मिळणारी पेन्शन किती असू शकते?

उत्तर : लाभार्थ्याला दरमहा रूपये १५०/– पेक्षा कमी पेन्शन मिळणार नाही.

प्रश्न : पेन्शनची रक्कम कशी मिळते?

उत्तर : पेन्शनची रक्कम जमा करण्यासाठी लाभार्थ्यांचे नांवे बँक किंवा पोस्ट ऑफिस मध्ये खाते उघडले जाते. त्यावर पेन्शनची रक्कम त्या खात्यात जमा केली जाते व खातेदार ती रक्कम काढू शकतो.



प्रश्न : पेन्शन रकमेची मनीऑर्डर पाठविता येते का?

उत्तर : होय, पेन्शनची रक्कम मनीऑर्डरने पाठविता येते.

प्रश्न : स्थानिक पंचायत किंवा शहरी संस्थेने दिलेल्या आदेशाविरूध्द कुठलीही दाद मागता येते का?

उत्तर : होय. अर्जदार स्वत: किंवा ग्रामपंचायत किंवा प्रकरणात ज्याचे हित आहे अशी व्यक्ती महसुल विभागाचे विभागीय/उप विभागिय अधिकाऱ्यांकडे तक्रार करू शकतो.

प्रश्न : सदरहू तक्रारीचा निपटारा कसा केला जातो ?

उत्तर : त्या संदर्भात महसुल विभागाचे विभागीय/उप विभागीय अधिकारी चौकशी करून अर्जदारास पेन्शन मंजूर करू शकतात किंवा अनुचितपणे दिली गेलेली पेन्शन रद्द करू शकतात.

प्रश्न : पेन्शन योग्य स्वरूपाने स्विकारली जात आहे का, किंवा ती अनुचितपणे नाकारल्याची बाब कुणीही स्वत:हून चौकशी वा देखरेख करू शकते का?

उत्तर : होय, त्याकरिता प्रत्येक उप–विभागात एक समिती बनविली गेलेली आहे. उप–विभागिय अधिकारी सदरहू समितीचे अध्यक्ष असतात. समितीचा एक सदस्य उप संचालक पंचायत व सामाजिक न्याय किंवा त्यांनी निवडलेला अधिकारी असतो व एक प्रतिनिधी स्थानिक पंचायत वा परिषदेमधून असतो.

प्रश्न : या समितीचे कार्य काय असते?

उत्तर : सदरहू समिती स्वत: पेन्शनच्या काही प्रकरणांची पडताळणी करते.

प्रश्न : सदरहू समिती पेन्शन बंद देखील करू शकते का?

उत्तर : होय, जर अपात्र लाभधारक किंवा अयोग्य लाभार्थी यांना पेन्शन दिली गेली तर सदरहू समिती पेन्शन बंद देखील करू शकते.

# ५. एडस् ओळखा

एडसचे पूर्ण नांव 'अॅक्वायर्ड इम्युनो डिफिसियसी सिन्ड्रोम' असे आहे. जसे त्याचे नांवातून स्पष्ट होते की शरीराची ही एक अशी अवस्था आहे ज्यामध्ये आपले शरीराची आजारपणाशी लढण्याची नैसर्गिक ताकद पूर्णत: समाप्त होते. ज्याप्रमाणे कुठलाही किल्ला सैनिकांशिवाय सुरक्षित नसतो त्याप्रमाणे प्रतिरक्षा तंत्राखेरीज आपले शरीर देखील कुठल्याही आजाराचे सहजपणे शिकार बनते. त्या स्थितीत कुठलेही औषध आपले काम योग्य तऱ्हेने करू शकत नाही.

<u>एडस् केव्हा होतो ?</u>



ज्यावेळेस आपले रक्तात एच.आय.व्ही नावाचे विषाणूचे संक्रमण होते त्या अवस्थेस एच.आय.व्ही. पॉझिटिव्ह अवस्था म्हटले जाते. या अवस्थेत एडस् होण्याचा धोका असतो. मात्र कित्येक प्रकरणात एच.आय.व्ही. पॉझिटिव्ह होणे व एड्सचा रोगी होणे यामध्ये अनेक वर्षाचे अंतर देखील आढळते. परंतू हे अंतर निश्चित नसते.



<u>एच.आय.व्ही. संक्रमण कसे होतो?</u>

एच.आय.व्ही. संक्रमण मुख्यत्वे ४ प्रकारे होते –

१. दोन व्यक्ती दरम्यान असुरक्षित यौन संबंधातून ज्यामध्ये कुठल्याही प्रकारच्या शारिरीक स्त्रावांचा रक्त, विर्य, योनि स्त्राव, लाळबद्ध परस्परांशी संपर्क येतो.

२. संक्रमित व्यक्तीचे रक्त दिले गेल्याने.

३. संक्रमित सुईचा वापर (चिकित्सेच्या वेळेस, गोंदताना, नशेचे इंजेक्शन) केल्याने.

४. संक्रमित मातेकडून गर्भातील शिशुला.



<u>एच.आय.व्ही. संक्रमण म्हणजे मृत्यु आहे का ?</u>

नाही, अजिबात नाही. हे केवळ एक प्रकारचे रक्ताचे संक्रमण आहे. आधुनिक चिकित्सा पध्दती आणि विशिष्ठ औषधे व सुरक्षित जीवनचर्येचे आधारे आपण या संक्रमणाशी लढू शकतो. त्याचप्रमाणे संक्रमणापूर्वी आपण जी काही कामे करू शकत होता जसे नियमित कामावर जाणे, अभ्यास करणे, मित्रांबरोबर भोजन करणे वगैरे ती कामे पुढेही पार पाडू शकतो. सर्व शासकीय/सरकारी दवाखान्यात या आजारासाठी विना मोबदला/मोफत गोपनीय पध्दतीने औषधोपचार तसेच वैद्यकीय सल्ला उपलब्ध आहे. मात्र नियमित स्वरूपाने आपली तपासणी करीत राहणे व औषधे

घेत राहणे आवश्यक आहे. तसेच ज्या कारणांनी संक्रमण वाढते ती कारणे टाळणे आवश्यक आहे. तुमची बेपर्वाइ तुमच्या कुटुंबाचे त्रासाचे कारण बनणार नाही याची काळजी घ्या. या थोड्या सुरक्षा उपायांमुळे आपण आपले जीवन सामान्य स्वरूपाने आनंदी व सौहार्दपूर्ण पध्दतीने जगू शकता. तुमचे कुटुंबिय तुमच्यावर प्रेम करतात. तुमचे जीवन कुठल्याही संक्रमणापेक्षा अधिक शक्तिशाली आणि सुंदर आहे.


एच.आय.व्ही. संक्रमण बचाव शक्य आहे का ?

होय. का नाही. सर्दी – खोकल्या सारख्या इतर संक्रमणा प्रमाणेच हे एक संक्रमण आहे. आपण स्वत: तसेच आपले जोडीदारास (पती/पत्नी) त्या कारणांपासून दूर ठेवा ज्या कारणांनी एच.आय.व्ही. चा विषाणू आपल्या रक्तापर्यंत पोहचतो.

हे कायम लक्षात ठेवा की,



- यौन संबंधात एकापेक्षा अधिक साथीदार बनवू नका. कायम कन्डोमचा वापर करा. आपल्या जोडीदारा सोबत प्रामाणिक रहा.
- रक्तदान करण्यापूर्वी सर्वप्रथम रक्ताची एच.आय. व्ही. /एड्स चाचणी अवश्य करा.
- विशेषत: सुईद्वारे टोचून नशिले पदार्थ घेऊ नका.
- इंजेक्शन घेताना कायम डिस्पोजेबल सिरींजचा उपयोग करा आणि ती तत्काळ आपल्या समोर नष्ट करण्यास सांगा.
- संक्रमण झाल्याचे निष्पन्न झाल्यावर योग्य ती तपासणी व वैद्यकीय सल्ला घेतल्यानंतरच गर्भधारणेचा निर्णय घ्या.



एच.आय.व्ही. संक्रमीत झाल्यावर माझे अधिकार काय आहेत?

एच.आय.व्ही. संक्रमणाने माझे सामान्य घटनात्मक तसेच नागरी अधिकारात कुठलाही फरक पडत नाही. इतरांप्रमाणेच आपले अधिकार देखील तसेच सुरक्षित रहतात. होय, मात्र ही बाब दुर्भाग्यपूर्ण आहे की, माहिती अभावी कित्येक लोकांवर त्यांचे स्वत:चे कुटुंबिय, समाज तसेच कामाचे ठिकाणी अनेक प्रकारे भेदभाव केला जात आहे. व्यक्ती सोबत केला जाणारा भेदभाव किंवा सामाजिक/व्यावसायिक बहिष्कार हा असामाजिक, अमानविय तसेच निंदनीय व बऱ्याचदा बेकायदेशिर देखील आहे.

अशा प्रकरणांसाठी कुठलाही स्वतंत्र कायदा अस्तित्वात आहे का?

सध्या अस्तित्वात असलेल्या संविधानिक तरतुदी तसेच अन्य कायद्यांचे चौकटीत असलेले अनेक उपाय वापरून एच.आय.व्ही./एडस् पिडीत व्यक्तीचे अधिकार सुनिश्चित केलेले आहेत. तसेच एच.आय.व्ही./एडस् पिडीत व्यक्तींचे हिताचे रक्षण करणारा स्वतंत्र कायदा बनविण्याचा

प्रयत्न केला जात आहे.

<u>कायदा काय सांगतो ?</u>

एच.आय.व्ही./एडस् पिडीत व्यक्तींकरिता सर्वात मोठी समस्या भेदभाव/समाजाने बेदखल करणे ही आहे. आपले संविधानात नमुद असलेल्या मुलभुत अधिकरांनी अशा कुठल्याही भेदभावास चुकीचे ठरविलेले आहे.

चला तर मग हे बघूया की, एच.आय.व्ही./एडस् पिडीत व्यक्तींचे प्रकरणात मुलभूत अधिकरांची व्याप्ती काय असते ?

<u>समानतेचा अधिकार</u>

ज्या प्रकारे धर्म, जात, लिंग वगैरे कारणांनी भेदभाव करता येत नाही त्याचप्रकारे एच. आय.व्ही. संक्रमणाचे आधारे सार्वजनिक वापराचे ठिकाणी, जनसेवा देताना अगर लोक–नियोजन (नोकरी/व्यवसाय) वगैरे क्षेत्रात भेदभाव केला जाऊ शकत नाही. जर कुणाही व्यक्ती बरोबर त्या कारणाने भेदभाव किंवा उत्सवाचे ठिकाणी बंदी लादली गेली असेल तर ती व्यक्ती न्यायालयाकडून न्याय मिळवू शकते. त्याचबरोबर माननिय उच्च न्यायालयाने एच.आय.व्ही / एड्स पिडीत व्यक्तींची प्रायव्हसी तसेच गोपनियता अबाधित ठेवली जाण्याचे निर्देश दिलेले आहेत. केवळ काही विशिष्ट परिस्थितीतच त्यामध्ये सुट दिली जाऊ शकते.



<u>स्वतंत्रतेचा अधिकार</u>

एच.आय.व्ही / एड्स पिडीत व्यक्ती आपले इच्छेनुसार व्यवसाय, राहण्याचे ठिकाण निवडू शकते. त्यांना त्यांच्या स्वत:चा समूह / संघटना बनविण्याचे विचार व्यक्त करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. प्रवास करण्याचे स्वातंत्र्य आहे.

<u>जीवन जगण्याचा तसेच व्यक्ती स्वतंत्रतेचा अधिकार</u>

जीवन हे सर्वांगसुंदर आहे. त्यामध्ये केवळ शरीर रक्षणच नाही तर जीवन सुंदर करणाऱ्या सर्व बाबी जसे – पोषण, आरोग्य, पर्यावरण तसेच शिक्षण यांचा समावेश आहे.

- कुणीही सरकारी चिकित्सक एच.आय.व्ही. / एड्स पिडीत व्यक्तीस उपचार नाकारु शकत नाही आणि त्यांचे संक्रमणाची माहिती गोपनीय ठेवली जाते ज्यामुळे त्यांची खाजगीत तसेच सन्मानाची रक्षा केली जाऊ शकते.
- गोपनियता अधिकार – काही खास परिस्थिती वगळता कुणाही एच.आय.व्ही. (+) व्यक्तीस एच.आय.व्ही. / एड्सच्या तपासणीकरिता अडविले जाऊ शकत नाही. तसेच तपासणीचे निष्कर्ष गोपनीय ठेवले जातात. मात्र आपण व आपल्या परिजनांच्या सुरक्षेकरिता आपण ऐच्छिक स्वरूपाने तपासणी करणे आवश्यक असते.
- आपण इतर लोकांप्रमाणेच सार्वजनिक सेवा, शौचालये, भोजनालये, दूरध्वनी, संगणक, वाहन इत्यादींचा वापर करू शकता कारण यापैकी कुठल्याही गोष्टीने एच.आय.व्ही. /

एड्सचा फैलाव / प्रसार होत नाही.

- केवळ एच.आय.व्ही. पॉझीटीव्ह असल्याचे आधारे कामावरून काढून टाकणे, कामामध्ये वेगळे ठेवणे, घरातून हाकलून देणे बेकायदेशिर आहे.

शिक्षणाचा अधिकार

कुठलिही शाळा अगर कॉलेज कुठल्याही विद्यार्थ्यास तो एच.आय.व्ही. / एड्स पिडीत आहे म्हणून काढून टाकू शकत नाही तसेच त्याला स्वतंत्र / वेगळे बसण्यास सांगू शकत नाही.

शोषण / छळवणूकी विरूध्द अधिकार

एच.आय.व्ही. / एड्स पिडीत असल्याचे आधारे अगर अन्यथा देखील प्रत्येक नागरिकास त्याचे केले जाणारे शोषणाचा विरोध व त्या संदर्भात न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार आहे.

जीवनाच्या दुसऱ्या घटकांशी संबंधित अधिकार

विवाह :—

१. एच.आय.व्ही. / एड्स पिडीत व्यक्ती लग्न करू शकते.

२. आपणांस एच.आय.व्ही. / एड्स असल्यास त्या संदर्भाने आपले भावी जीवन साथीदारास पूर्व कल्पना द्यावी अन्यथा ते घटस्फोटाचे कारण होऊ शकते.

३. विवाह बंधनात बध्द होण्यापूर्वी आपण ऐच्छिक रितीने फक्त एच.आय.व्ही नव्हे तर अन्य रोग व खास करून थायसिमिया, ॲनिमिया, सिकलिंग, मधुमेह इत्यादींची आवश्यक ती चाचणी करा व तुमच्या भावी साथीदारास सांगा.



संतानउत्पत्ती

गर्भधारणेपूर्वी होणाऱ्या बाळास संक्रमण होण्याची शक्यता तसेच त्याचे पालन पोषणाची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

घटस्फोट :—

एच.आय.व्ही. / एड्स लपवून फसवणुकीने केलेला विवाह हा घटस्फोटाचे कारण होऊ शकतो.

पालन पोषण आणि बालकाचे संगोपन :—

सर्वसाधारणपणे लहान बालकाचे संगोपन आईकडे सोपविले जाते. एच.आय.व्ही./एड्स ग्रस्त असल्याचा त्यावर कुठलाही प्रभाव पडत नाही. अशा स्थितीत आपले समुदायाचे विवाह कायद्यानुसार त्याला पालन—पोषण मागण्याचा अधिकार आहे.

मालमत्ता / संपत्ती :—


एच.आय.व्ही. / एड्स ग्रस्त असल्याने पिता अथवा पतीचे संपत्तीमध्ये अधिकार मागण्यावर कुठलाही प्रभाव पडत नाही. संपत्तीचे प्रश्न व्यक्तीगत कायद्यानुसार जसे हिंदू वारसा कायदा वगैरे नुसार सोडविले जातात.

या संदर्भाने देशाचे विविध राज्यात वाढत चाललेल्या कुप्रथेची उदाहरणे समोर आलेली

आहेत. जर कुठल्याही कुटुंबात कुणा व्यक्तीचा (वडील / पती) मृत्यु एड्समुळे झाला असेल तर कुटुंबाच्या अन्य सदस्यांद्वारे त्याच्या आश्रित (पत्नी / मुले) यांना जबरदस्तीने मिळकत / संपत्ती मधून बेदखल केले जाते. ही प्रथा पूर्णत: बेकायदेशीर आहे.

एच.आय.व्ही / एड्स व काम करण्याचा अधिकार

- तुमच्या माहिती किंवा सहमतीशिवाय कुणीही मालक / नियोक्ता / कंपनी तुम्हाला शारिरीक तपासणीचे नांवावर एच.आय.व्ही. तपासणी करिता जबरदस्ती करू शकत नाही.
- जर तुम्ही आवश्यक ते शिक्षण घेतले असेल, काम करण्यास लायक असाल आणि तुमच्यापासून तुमच्या सहका–यांना संक्रमणाचा धोका नसेल तर तुम्हाला नोकरीत ठेवले जाण्याचा पूर्ण अधिकार आहे.
- प्रत्येक नियुक्ती करणाऱ्याने हे सुनिश्चित करणे आवश्यक आहे की –
  - एच.आय.व्ही. संक्रमित व्यक्तींबरोबर भेदभाव केला जाणार नाही.
  - एच.आय.व्ही. संक्रमित व्यक्तीं बरोबर वागणूक कशी असावी या संदर्भात अन्य कर्मचाऱ्यांकरिता स्पष्ट व जाहीर आचारसंहिता असावी.
  - लेखी स्वरूपाचे एच.आय.व्ही. धोरण असावे.
  - गोपनीयता
  - नियोजनपूर्वक एच.आय.व्ही. तपासणी करू नये.
  - वार्षिक आरोग्य तपासणी मध्ये एच.आय.व्ही. समाविष्ट नसावी.



एच.आय.व्ही / एड्स तसेच आरोग्यासंबंधी अधिकार

- प्रत्येक शासकिय दवाखान्यात एच.आय.व्ही / एड्सची तपासणी पूर्णत: गोपनीय स्वरूपाची तसेच विना मोबदला आहे. त्यासाठी आपल्या जवळच्या आय.सी.टी.सी. आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा.
- अशा केंद्रामध्ये एच.आय.व्ही. साठी प्रतिबंधात्मक उपचार तसेच औषधे विना मोबदला दिले जातात.
- एच.आय.व्ही / एड्सची पिडीत व्यक्तींसोबत आरोग्य विभागाचे कर्मचारी तसेच इतर रोगी किंवा त्यांचे नातेवाईकांना भेदभाव करता येणार नाही.
- एच.आय.व्ही / एड्स पिडीत व्यक्तींचे इलाजादरम्यान क्लिनीकल संपर्कामुळे होउ शकणारी संक्रमणाची शक्यता थांबविली पाहिजे.
- जर कुणाही सामान्य रोग्यास इस्पितळात असताना कुणाही सामान्य रोग्यास कुठल्याही उपचार / निदान प्रक्रियेत किंवा रक्त प्रदान केल्याचे कारणाने एच.आय.व्ही / एड्सचे संक्रमण झाले असेल तर ग्राहक संरक्षण न्यायालयात नुकसानभरपाई संबंधात त्या इस्पितळ / चिकित्सक / रक्त केंद्र यांचेकडून मागू शकतो.

एच.आय.व्ही / एड्स व देह व्यापार :

- कुठल्याही प्रकारे देह व्यापार करणे अगर त्याकरीता उद्युक्त करणे शिक्षापात्र गुन्हा आहे. हे खरे आहे की, यात अडकलेले लोक सामाजिक आर्थिक कारणांचे शिकार असतात. शासनाचा प्रयत्न हा आहे की, प्रत्येक स्थितीत अशा लोकांचा एच.आय.व्ही./एड्सचे संक्रमणापासून बचाव व्हावा. जर संक्रमण झालेच तर आवश्यक ते सर्व उपचार व पुनर्वसन व्हावे. त्याकरिता देह व्यापार करणाऱ्या व्यक्ती आपल्या जिल्हयाच्या एड्स नियंत्रण समितीशी संपर्क करु शकतात. त्याचप्रमाणे वेळोवेळी आपली एच.आय.व्ही. / एड्स तपासणी करत रहावी.
- देह व्यापार करताना प्रत्येक वेळेस कन्डोमचा वापर करावा.

आपले अधिकारांचे हनन झाल्यास खालील संस्थांशी संपर्क साधावा –

- महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण समिती, मुंबई. (एम.एस.ए.सी.एस.)
- एड्स व एच.आय.व्ही. सोबत जगणाऱ्या लोकांचा समूह ;पी.डब्ल्यु.एच.ए.
- राष्ट्रीय मानव अधिकार आयोग ;एन.एच.आर.सी.
- राज्य मानव अधिकार आयोग ;एस.एच.आर.सी.
- जिल्हा विधी सेवा प्राधिकरण
- नोंदणीकृत सामाजिक संस्था ;एन.जी.ओ.

# ६. मानसिक आरोग्य कायदा, १९८७

मुनष्य कधी आनंदी होतो तर कधी दु:खी देखील होऊ शकतो. कधी त्याला चिंता तर कधी भिती सतावते. तर कधी बैचेनी व धाकधुक वाटते, कधी आशा पल्लवित होते, तर कधी नैराश्य येते. ही सर्व एक सहज प्रक्रिया आहे. मात्र यापैकी कुठलिही लक्षणे दिर्घकाळ राहू नयेत. जर निराशा न संपणारी हताशपणा बनली आणि दु:ख व भय दिर्घकाळ सुरू राहिले तर ते एका मानसिक आजारात बदलतात.

योग्य वेळेस योग्य सल्ला व उपचार मिळाल्याने सामान्य मानसिक आजार लवकर दुर केले जाऊ शकतात. मानसिक आजारांवर उपचार करणाऱ्या डॉक्टर्सना 'मनोचिकित्सक' म्हटले जाते. आपले समाजात सर्व साधारणपणे अशा डॉक्टर्सचा सल्ला–उपचार घेणाऱ्यांना लोक वेडे समजतात, त्यांचे सोबत त्यांचे कुटुंबियांचे वागणे ठीक नसते. त्यामुळे मानसिक रोग बरा होण्याऐवजी वाढत जातो. कित्येकदा मनोरूग्णास डॉक्टरकडे अशा वेळी आणले जाते ज्यावेळेस परिस्थिती हाताबाहेर गेलेली असते.

मानसिक आरोग्यासंदर्भाने जनजागृती करणे आवश्यक झालेले आहे. सर्वप्रथम हे जाणून घेणे आवश्यक आहे की, प्रत्येक मानसिक आजार हा गंभीर मनोविकार नसतो. प्रत्येक मानसिक रोगी हा वेडा नसतो. आपल्या समाजात सर्व प्रकारचे लोक राहतात. त्यामध्ये मनोरूग्ण देखील

असतात. कुटुंबिय व समाजाकडून त्यांच्याबाबत होणारा भेदभाव दूर करण्यासाठी सरकारने मानसिक आरोग्य कायदा, १९८७ लागू केलेला आहे. त्या कायद्याने मनोरूग्णाचे अधिकार, कायदेशिर सुरक्षा व उपचारपध्दती व सुविधा कशा असाव्यात ते सांगितले गेले आहे.

- मनोरूग्ण कुणाला म्हणतात ?

  या कायद्यानुसार मनोरूग्ण म्हणजे अशी व्यक्ती जी कुठल्याही मानसिक आजाराने त्रस्त आहे.

- मानसिक दृष्ट्या आजारी कैदी कुणाला म्हटले जाते?

  प्रस्तुतचे कायद्याचे कलम २७ नुसार खालील कैदी त्यात सामील होतात.

  असे कैदी ज्यांचेवर कुठल्याही मनोरूग्ण इस्पितळात भरती करून उपचार सुरू आहेत. मनोरूग्णाचे नर्सिंग होम, तुरूंग, सुधारगृह किंवा अन्य सुरक्षित जागी ठेवलेले मनोरूग्ण देखील यामध्ये सामील होतात.



- भारत सरकार व राज्य सरकारने याचे करीता कोणत्या सुविधा पुरविलेल्या आहेत?
  - भारत सरकार देशात कुठेही मनोरूग्णांचे उपचारासाठी दवाखाने आणि नर्सिंग होम उघडू शकते. राज्य सरकार देखील त्याप्रमाणे आपले राज्यात अशा तऱ्हेची इस्पितळे व नर्सिंग होम्स् उघडू शकतात. यामध्ये मानसिक आजाराने ग्रस्त लोकांना भरती केले जाते व त्यांचेवर उपचार व उत्तम देखभाल केली जाते.
  - १६ वर्षापेक्षा कमी वयाच्या मनोरूग्णांसाठी वेगळी इस्पितळे उघडली जातात.
  - दारू आणि अन्य नशिले पदार्थ सेवन करणाऱ्या मनोरूग्णांकरिता आणि कुठल्याही अपराधसिध्द दोषी मनोरूग्णांसाठी वेगळी मनोरूग्ण इस्पितळे व नर्सिंग होम्स् उघडले जातात.

- मनोरूग्ण इस्पितळे व नर्सिंग होम मध्ये उपचाराकरिता दाखल होण्याची पध्दत काय आहे?



  - स्वत:ला मनोरूग्ण समजणारी व्यक्ती उपचारासाठी डॉक्टरांकडे अर्ज करू शकते. त्यांना स्वेच्छेने भरती होणारे रोगी म्हटले जाते.
  - जर मनोरूग्ण बालक असेल तर आई–वडील किंवा पालक त्याला उपचारासाठी भरती करून घेण्यासाठी डॉक्टरांकडे अर्ज करू शकतात.
  - डॉक्टर २४ तासांचे आत त्याची तपासणी करतील ज्यामुळे याची माहिती मिळेल की रूग्णास भरती करून घेणे आवश्यक आहे किंवा नाही. जर आवश्यकता असेल

तरच त्याला भरती केले जाईल.

- इस्पितळात दाखल रूग्णास तेथील नियमांचे पालन करावे लागेल.
- मनोरूग्ण किंवा मानसिक रोगाने त्रस्त बालकाचे आई–वडिलांनी अर्ज केल्यापासून २४ तासाचे आत इस्पितळातून डिस्चार्ज मिळेल.

● <u>विशेष रोगी भरती करण्याची पध्दत कशी असते?</u>

- जर एखादा मनोरूग्ण स्वत: अर्ज करू शकत नसेल, तर त्याचे मित्र किंवा नातेवाईक त्याचेकरीता अर्ज करू शकतात. त्यानुसार डॉक्टर तपासणी करतात आणि गरज भासली तरच उपचाराकरीता भरती करून घेतले जाते.
- इस्पितळात कुणालाही ९० दिवसापेक्षा अधिक दिवस दाखल करून ठेवले जात नाही.
- रूग्णास डिस्चार्ज मिळण्यासाठी त्याचा कुणीही मित्र किंवा नातेवाईक अर्ज करू शकतो. अर्ज दाखल झाल्यानंतर मॅजिस्ट्रेट कोर्ट दाखल करणा–या मित्रास / नातेवाईकास नोटीस जारी करेल. त्यानंतर चौकशी करून योग्य वाटल्यास मॅजिस्ट्रेट अर्ज मंजूर / नामंजूर करेल.

● <u>ग्रहण आदेश (Reception Order) मिळण्यासाठी अर्ज कोठे करावा लागतो?</u>

- जर मनोरूग्णाची स्थिती चिंताजनक असेल तर कधी–कधी त्याला ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीकरिता इस्पितळात दाखल ठेवावे लागते. अशा रूग्णाकरिता पती–पत्नी किंवा त्याचा कुणीही नातेवाईक अर्ज करू शकतो. त्याला इस्पितळात दाखल करण्यासाठीचा अर्ज म्हटले जाते. सदरहू अर्ज मनोरूग्ण ईस्पितळाचा डॉक्टर देखील करू शकतो. तो अर्ज मॅजिस्ट्रेटकडे करावा लागतो.
- मनोरूग्णाचे आरोग्य, सुरक्षा तसेच त्याने दुसरे लोकांना हानी पोहचवू नये याकरिता देखील त्याला इस्पितळात ठेवणे आवश्यक आहे.

● <u>मनोरूग्णां संदर्भाने पोलिसांची जबाबदारी काय असते?</u>

- मानसिक दृष्ट्या आजारी व्यक्ती जर बाहेर फिरताना आपली स्वत:ची देखभाल करू शकत नसेल तर पोलिस ठाण्याचा अधिकारी त्याला आपले सुरक्षिततेखाली घेईल.
- मानसिक रोगी जर दुसऱ्या लोकांकरीता धोकादायक होऊ शकत असेल तर त्याला पोलिस अधिकारी ताब्यात घेईल.
- अशा मनोरूग्ण संदर्भाने पोलिस अधिकारी त्याचे नातेवाईक व मित्रांना कळवेल.
- अशा मनोरूग्णास २४ तासाचे आत दंडाधिकाऱ्यासमोर हजर करावे लागेल. दंडाधिकाऱ्याच्या आदेशाखेरीज त्याला कोठडीत ठेवता येणार नाही.

● <u>मनोरूग्णांचे हितासाठी मॅजिस्ट्रेट काय कार्यवाही करू शकते?</u>

- मॅजिस्ट्रेट हे मनोरूग्णाची बौध्दिक क्षमता/पातळी डॉक्टरांमार्फत तपासणी करून घेतात. सदरहू तपासणी नंतर मनोरूग्णाचे आरोग्य व सुरक्षेकरिता त्याला इस्पितळात ठेऊ शकते. जर लोकांकरीता सदरहू रूग्ण धोकादायक होत असेल तरच असा

आदेश दिला जातो.

- मनोरूग्ण नसणाऱ्या व्यक्तीस आपले सोबत घेऊन जाण्यासदर्भाने दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करावा लागतो. त्यासोबत एक बंधपत्र / बॉंड देखील भरून द्यावा लागतो.
- जर एखाद्या मनोरूग्णाचे नातेवाईक चांगले वागत नसतील अगर त्याची देखभाल करत नसतील तर त्याची माहिती पोलिसांना कळविणे आवश्यक आहे. पोलिस ठाणे अंमलदार त्या संदर्भाने त्वरीत दंडाधिकाऱ्याला कळवेल.
- अशा प्रकरणात दंडाधिकारी हे मनोरूग्णास हजर करण्याचा आदेश करतील. त्याकरीता मनोरूग्णाचे नातेवाईकास समन्स देखील जारी केले जाईल.
- आदेशानंतर देखील मनोरूग्णाची व्यवस्थित देखभाल होत नसेल तर संबंधित नातेवाईकास रूपये २०००/— इतक्या रकमेचा चा दंड होऊ शकतो.



- मनोरूग्णास कुणीही कायदेशीर नातेवाईक नसल्यास दंडाधिकारी सदरहू मनोरूग्णास इस्पितळात ठेवण्याचा आदेश करु शकतात.

● सरकारद्वारे तपासणी पथक नेमले जाते का ?

- होय, राज्य सरकार किंवा भारत सरकारने मनोरूग्णांकरिता स्थापन केलेल्या इस्पितळ व नर्सिंग होम्सची पडताळणी (निरीक्षण) करण्यासाठी पथक बनवेल. या दलामध्ये कमीत कमी पाच निरीक्षक असतील. तसेच या दलामध्ये एक मनोरूग्णांचा डॉक्टर व सामाजिक कार्यकर्ते आवश्यक असतील.

● मनोरूग्णाला इस्पितळातून कधी सोडले जाते ?

- मनोरूग्णांचे इस्पितळात दोन डॉक्टर्स रूग्णांची तपासणी करतात. त्यापैकी एक मनोरूग्ण चिकीत्सक असतो. ते दोघे डॉक्टर्स रूग्ण ठीक झाल्याचा अहवाल हॉस्पिटलचे प्रभारी डॉक्टरला सोपवितात. रिपोर्ट व रूग्णाची स्थिती एकमेकाशी जुळल्यानंतरच मनोरूग्णास इस्पितळातून सोडले जाते.



- मनोरूग्ण स्वत: देखील इस्पितळातून डिस्चार्ज मिळण्यासाठी अर्ज करू शकतो.

● जर इस्पितळाचे प्रभारी डॉक्टरला वाटले की रूग्ण हा इतर व्यक्तींकरीता धोकादायक नाही, त्यावेळेस त्याला डिस्चार्ज मिळू शकतो.

● मनोरूग्णाचे संपत्तीची देखभाल प्रस्तुतचे कायद्याने कशी केली जाते?

- मनोरूग्णाचे नातेवाईक, उत्तराधिकारी, वकील यांचे अर्जानुसार संबंधित मनोरूग्णाची वैद्यकीय तपासणी करण्याचा आदेश न्यायालय करेल.

- तपासणीमध्ये रूग्ण हा संपत्तीची देखभाल करण्यास समर्थ न आढळल्यास न्यायालय वरीलपैकी एकास संपत्तीचा प्रबंधक बनवेल.
- प्रबंधक किंवा पालक मनोरूग्ण, त्याची संपत्ती व त्याचेवर अवलंबून असलेल्या व्यक्तींची जबाबदारी सांभाळेल.

● <u>मनोरूग्णांना मानवाधिकार असतात का?</u>
- होय, मनोरूग्णास मानसिक अधिकार असतात. उपचारा दरम्यान त्याची शारिरीक किंवा मानसिक छळवणूक करता येत नाही.
- इलाजादरम्यान त्यांचे हिताचे नसलेले कुठलेही प्रयोग त्यांच्यावर करता येत नाहीत.

● <u>मनोरूग्णांसाठी अवैध दवाखाने उघडल्यास शिक्षा होते का ?</u>
- प्रस्तुतचे कायद्याविरुध्द कुणीही मनोरूग्णांकरिता इस्पितळ उघडू शकत नाही.
- असे करणाऱ्यास तीन महिने कारावासाची शिक्षा किंवा दंड रू.२००/– किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.
- तशा प्रकारचा गुन्हा परत केल्यास अपराध्यास सहा महिने कारावासाची शिक्षा किंवा दंड रू.१०००/– किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.
- अशा स्वरूपाच्या इस्पितळात मनोरूग्णास भरती केल्यास दोन वर्षे कारावासाची शिक्षा किंवा दंड रू.१०००/– किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.
- या कायद्याचे नियम व तरतूदीचे विरूध्द गेल्यास सहा महिने कारावासाची शिक्षा किंवा दंड रू.५००/– किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.
- मनोरूग्णाचे प्रकरणात वकील न दिल्यास न्यायालय मोफत वकील उपलब्ध करून देते.
- राष्ट्रीय, राज्य तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणे मनोरूग्णास मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला पुरविते.

# ७. विकलांगांचे/अपंगांचे कायदे व अधिकार

प्रश्न : आपल्या देशात किती प्रकारचे व किती अपंग आहेत ?

उत्तर : विश्वभरात एकूण ४५ कोटींपेक्षा जास्त लोक अपंग आहेत. आपल्या भारतात चार कोटींपेक्षा जास्त अपंग लोक राहतात. त्यापैकी एक कोटी अंध आहेत. २५ लाख लोक बहिरे आहेत. साधारणपणे ६० लाख लोक असे आहेत ज्यांना कुठलातरी एक अवयव नाही. मंदबुध्दी लोकांची संख्या दीड कोटींच्या आसपास आहे. (संदर्भ ग्रंथ :– 'विकलांग बालक', प्रकाशक – प्रभात प्रकाशन, नवी दिल्ली, लेखक – जगजित सिंह)

प्रश्न : अपंगत्व कुठल्या कारणांनी येऊ शकते?

उत्तर : अपंगत्वाची अनेक कारणे असतात. अपंगत्व जन्मजात असु शकते.काम करताना किंवा रस्ते अपघातात देखील लाखो लोक अपंग होतात. शारिरिक व मानसिक आजार हे देखील अपंगत्वाचे एक प्रमुख कारण आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे देखील बरेच लोक अपंग बनतात. कधी–कधी खाण्यापिण्याची कमतरता तसेच नशेच्या कारणाने देखील अपंगत्व येऊ शकते. अपंग लोकांना भेदभावाचा देखील सामना करावा लागतो. बरेचदा त्यांना त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवले जाते.



प्रश्न : अपंगाच्या अधिकारांचे रक्षण होण्यासाठी कोणकोणते कायदे आहेत?

उत्तर : अपंग व्यक्ती; हक्क, समान संधी व पूर्ण सहभाग कायदा–१९९५ त्याकरीता बनविलेला आहे. तसेच त्यांच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी संबंधित प्रत्येक कामात त्यांची भागीदारी देखील ठरवून देते.



- 'मानसिक आरोग्य कायदा, १९८७' मनोरूग्णांचे हिताचे रक्षण करतो.
- मंदबुध्दी, अपंग, लकवा पिडीत व्यक्तींचे कल्याणासाठी 'राष्ट्रीय न्यास कायदा, १९९९' बनविला गेला आहे.
- 'भारतीय पुनर्वसन परिषद कायदा, १९९२' तसेच 'भारतीय पुनर्वसन परिषद (सुधारणा) कायदा २०००' हे पुनर्वसन तसेच विशेष शिक्षण देणाऱ्या व्यक्तींचे प्रशिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी बनविला गेला आहे.
- 'विधी सेवा प्राधिकरण कायदा १९८७' च्या अंतर्गत अपंग व्यक्तींना मोफत विधी सहाय्य मिळण्याची तरतूद आहे.

प्रश्न : कायदयामध्ये कुठल्या अपंगांना लाभासाठी पात्र ठरविलेले आहे ?

उत्तर :
- कायदयानुसार नेत्रहिन, अतिशय अधू दृष्टीच्या लोकांना लाभासाठी पात्र ठरविलेले आहे.
- ज्या कुष्ठरोग्यांचा रोग बरा झालेला आहे मात्र त्या कारणाने कुठल्याही प्रकारचे अपंगत्व आलेल्या लोकांस लाभासाठी पात्र ठरविलेले आहे.
- ऐकू न येणारे (बहिरे), हिंडण्या–फिरण्यास असमर्थ, मनोरूग्ण तसेच मंदबुध्दी व्यक्ती कायदेशिर लाभास पात्र आहेत.
- वर नमूद सर्व प्रकारचे अपंग लोकांना लाभ घेण्यासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. कुठल्याही प्रकारचे कमीत कमी ४० टक्के अपंगत्व असणारी व्यक्ती लाभास पात्र आहे.

प्रश्न : कायदा अपंगांना रोजगाराची कोणकोणती संधी देतो?

उत्तर :
- प्रत्येक सरकारी विभागात ३ टक्के जागा अपंगांसाठी राखीव असतात. त्यामध्ये नेत्रहीन अगर अधू दृष्टी, कमी ऐकू येणारे, लकवाग्रस्त लोकांसाठी प्रत्येकी एक टक्का पद आरक्षित असते.
- गरिबी हटावाच्या सर्व योजनांत अपंग लोकांना ३ टक्के पदे आरक्षित असतात. त्यांचेकरिता अतिरिक्त पदे देखील तयार केली जातात.

प्रश्न : प्रस्तुतचा कायदा कामाचे ठिकाणी अपंग लोकांबरोबर होणारा भेदभाव कशा प्रकारे थांबवितो?

उत्तर : सरकारी विभागात 'अपंगत्व' या एकमेव कारणाने पदोन्नती नाकारली जात नाही. सरकारी नोकरी करताना अपंगत्व आल्यास नोकरीतून काढून टाकले जात नाही त्याचप्रमाणे खालचे पदावर देखील आणले जात नाही.

## सारांश

आपले माता–पिता आणि वरिष्ठ नागरिकांचे अधिकारांचे हनन झाले तर त्यांचे संरक्षण व मदतीकरीता कायदा आहे. एका बाजूस कायदा माहिती पुरवून त्याच्या अधिकारांचे रक्षण करतो तर दुसरे बाजूस कायदे सुचना देऊन सावध देखील करतो. याच उददेशाने वृद्धावस्था पेन्शन योजना बनविलेली आहे. आपले समाजात सर्व सामिल आहेत, त्यामध्ये जसे युवक आहेत तसेच वयोवृद्ध देखील आहेत, महिला आहेत तर पुरूष देखील आहेत, श्रीमंत आहेत तर गरीब देखील आहेत, धडधाकट आहेत तर अपंग देखील आहेत. तसेच एड्सग्रस्त सुध्दा आहेत. कायदा सर्वांचे रक्षणासाठी आहे.

मनोरूग्ण असो किंवा अपंग, ते देखील देशाचे नागरिक आहेत तसेच त्यांच्या दु:खातून त्यांना बाहेर काढणे सर्व समाजाचे कर्तव्य आहे. त्यांचेशी संबंधित कायदे व नियमांचे माध्यमातून आपले घटनेच्या तरतूदीव्दारे त्यांना यथाशक्ती सामाजिक तसेच आर्थिक सुरक्षा पुरविली जाते.

# अनुसुचित जाती / अनुसुचित जमाती तथा अदिवासीचे अधिकार

# १. अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती अधिनयम

सामाजिक समरस्ता व सामाजिक मैत्र भावातूनच एका विकसित समाजाच्या निर्मितीचे स्वप्न साकार होऊ शकते. अनुसुचित जाती / अनुसुचित जमातीच्या केवळ आर्थिक उन्नतीने हे साध्य होणार नाही. या जातींना बरोबरीचा सन्मान देवून संपूर्ण समाजाला एकाच पातळीवर आणल्यानेच खरा विकास शक्य आहे.

आपल्या आजुबाजूला आजही नेहमीच अशा घटना पाहण्यास अथवा ऐकण्यास मिळतात की, ज्यामुळे समरस्तेचा साचा डळमळीत होऊ लागतो व आपली मान लज्जेने खाली झुकते.

खालील घटनांवर नजर टाका

घटना एक

एका जिल्ह्यात प्रजासत्ताक दिनाच्या प्रसंगी प्रशासनाद्वारे निर्णय घेतला गेला की, ध्वजारोहण ग्रामपंचायतीच्या एका अनुसुचीत जातीच्या महिला सरपंचाद्वारे केला जावे. एका गटाच्या काही खोडसाळ तत्त्वांना ही गोष्ट असह्य झाली. ध्वजारोहणाची कार्यवाही स्थगीत तर करता येत नव्हती. एका कटकारस्थानाप्रमाणे फडकीविल्या जाणाऱ्या झेंड्याच्या दोरीत गाठ अशा प्रकारे बांधली की, ती सुटू नये. प्रजासत्ताक दिनाच्या समारंभाप्रसंगी जेव्हा झेंडा फडकवण्याचा प्रयत्न केला गेला तेव्हा हास्यास्पद स्थिती झाली. झेंड्याची गाठच सुटली नाही. देशाचा हा प्रतिष्ठीत उत्सव चेष्टा बनला गेला. त्याचे एक मात्र कारण म्हणजे महिला सरपंच दलित होती.

घटना दोन

एका मोठ्या गावाच्या बाहेरील असलेल्या महामार्गावर चालविलेल्या धाब्यावर एक दलित मजूर दांपत्य चहा पिण्यास गेले. त्यांनी दोन कप चहाची ऑर्डर दिली. ते दांपत्य स्थानीक होते. त्यांना धाबामालक विक्रमसिंह ओळखत होता. चहा बनून तयार झाला. त्यांना प्लास्टीकच्या पिशवीमध्ये चहा दिला गेला.

एका ग्राहकाने धाबा मालकांस विचारले की, "यांना प्लास्टीकच्या मगात चहा देत आहात, काचेच्या ग्लासात का देत नाहीत?" विक्रमसिंह म्हणाला, "धाबा कसा चालवायचा हे आम्हाला शिकवू नका भाऊ. दलितांना चहा द्यायला आम्ही नकार थोडीच देत आहोत. परंतू त्यांना चहा प्लास्टीकच्या मगातच देतो. जे मग ते स्वतःच धूवून जातात." ग्राहक कावरा–बावरा होऊन विक्रमसिंहच्या चेहऱ्याकडे पाहू लागला.

घटना तीन

सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत शाळांमधून विद्यार्थ्यांसाठी मध्यान्ह भोजनाची व्यवस्था केलेली आहे. या व्यवस्थेच्या मागे असाच विचार होता की, मध्यान्ह भोजन मिळाल्याने दुर्बल – निर्बल मुलांचा कुपोषण स्तर कमी होऊ शकेल, एक दुसऱ्यांसोबत बसून भोजन केल्याने शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील दुरावा कमी व्हावा व सर्व जाती धर्मांची मुले एकमेकांसोबत बसून जेवण करू

शकतील. परंतु अशाही बातम्या वाचण्यात व ऐकण्यात येतात की, बऱ्याचशा शाळांमधून मधल्या सुट्टीमध्ये भोजनाच्या वेळी उच्चवर्गीय व सवर्ण समाजातील मुले दलित मुलांसोबत बसून जेवण करीत नाहीत. दलित मुले वेगळीकडे बसून जेवण करतात. बऱ्याच शाळांमधून असेही पाहण्यात आले की, जिथे जेवण तयार करणारी महिला दलित आहे, तिथे संवर्ण मुलांचे आई–वडीलांनी आपल्या मुलांना तिच्या हातचे जेवण घेण्यांस मनाई केलेली आहे.

घटना चार

वर्तमानपत्रांमधून बऱ्याच वेळा ही लज्जास्पद बातमी वाचावयास मिळाली आहे की, काही वादामुळे दलित महिला सरपंचाला विवस्त्र करून गावातून फिरविले.

शतकानुशतके जंगलात राहत आलेला जनजमाती समाज आपली संस्कृती व परंपरा टिकवून राहत असल्याने जंगल हाच त्यांचा रोजगार आहे. जंगलातूनच त्यांना फळे, इंधन, डिंक, औषधी वनस्पती व मुळ्या, वन्य साहित्य व आश्रय मिळतो. ते असेच मानतात की, जंगल त्यांचेच आहे व जंगलावर त्यांचाच अधिकार आहे. यावरून नेहमीच वनवासी व वन कर्मचारी यांचेत संघर्ष होत असतो. मुक्त जमीनी बाबतही बऱ्याच वेळा वाद होतात.

वनवासींच्या अधिकारांना निश्चितता आणण्यासाठी शासनाने "वन अधिकार अधिनियम," पारीत केले आहे.

अनुसुचीत जाती व जमातीचे लोक सन्मानाने राहू शकतील, त्यांच्यावर अत्याचार होऊ नयेत व कुठलाही भेदभाव होऊ नये यासाठी कायदे बनविले आहेत.

## २.अनुसूचीत जाती/अनुसूचीत जमाती तसेच वनवासींचे अधिकार

अनुसूचीत जाती अथवा अनुसूचीत जमाती व वनवासींचे अधिकार सविस्तरपणे जाणून घेण्यासाठी चला वाभवे गावात जाऊ जेथे पंचायत सरपंचाने बोलविल्याप्रमाणे दोन दिवसांची सभा आयोजित केली आहे. आपले अधिकार लोक जाणून घेऊ इच्छित आहेत. लोकांच्या प्रश्नांची उत्तरे देत आहेत सरपंच साहेबराव व सचिव बाबुराव. मंचाच्या पाठीमागे एक बॅनर लावलेले आहे. ज्यावर लिहीलेले आहे की, "अनुसूचित जाती व अनुसूचीत जमाती व वनवासींचे अधिकारांविषयी जागरूकता शिबीर" व शिबिराकरीता हजर असलेले लोक प्रश्न विचारतात.

शंकर : अनुसूचीत जाती / अनुसूचीत जमातीच्या लोकांवर होणाऱ्या अत्याचाराविरुध्द कोणता कायदा बनविला आहे ?


सरपंच :
- या लोकांवर होणाऱ्या अत्याचाराविरुध्द "अनुसुचित जाती व अनुसूचीत जमाती (अत्याचार निर्मुलन) कायदा, १९८९" बनविला आहे.
- हा कायदा या लोकांवर होणारा अत्याचार व गुन्ह्यांना थांबविण्यासाठी बनविला आहे. अत्याचार पिडीत विस्थापित लोकांचे पुनर्वसन करण्यासाठीही हा कायदा मदत करतो.

मीरा : या कायद्यामध्ये कोणकोणत्या अत्याचारांवर (अपराधावर) शिक्षेचे प्रयोजन आहे? (कलम ३)

सरपंच : अनुसूचीत जाती / अनुसूचीत जमाती (अत्याचार निर्मूलन) कायद्याच्या कलम – ३ नुसार अनुसूचीत जाती / अनुसूचीत जमातीची व्यक्ती नसेल व या जाती / जमातीच्या व्यक्तीवर खालीलपैकी कुठलाही अत्याचार केला असेल तर त्याबाबत शिक्षेचे प्रयोजन आहे.
- खाण्यालायक नसलेला अथवा हानीकारक पदार्थ खाण्यास अथवा पिण्यास सक्ती करणे.
- त्यांच्या घरात शौच, मुत्र, अथवा इतर कुठली घाण फेकली असेल.
- त्यांच्या जमीनीवर कब्जा केला असेल अथवा त्यावर शेती केली असेल.

शंकर : वाटप न झालेली जमीन बेकायदेशीरपणे हस्तांतरीत केल्यासही कार्यवाही केली जाऊ शकते का ?

सरपंच :
- हो, नक्कीच केली जाऊ शकते, जर त्यांच्या जमीनीतून त्यांना बेदखल केले असेल किंवा त्यांच्या वापरातील जमीन, पाणी व परिसर यात अवैधपणे हस्तक्षेप केला असेल तर त्यास ही शिक्षा होऊ शकते. याशिवाय जो त्यांना मतदान करण्यापासून रोखेल अथवा कुणा विशिष्ट व्यक्तींच्या पक्षात मतदान करण्यास भाग पाडत असेल किंवा जो त्यांना बंधक बनविल अथवा जबरदस्तीने विनामोबदला मजूरी करुन घेईल अथवा त्यांचे विरुध्द खोटा दावा दाखल करेल अथवा खोटे दोषारोप लावून कायद्याची कार्यवाही करेल अशांना ही शिक्षा होऊ शकते.



- काही ठिकाणी तर जबरदस्तीने कपडे उतरवून अथवा चेहरा किंवा शरिराला रंगवून त्यांना जबरदस्तीने फिरविले जाते. या गुन्ह्यालाही शिक्षा केली जाते. या शिवाय त्यांच्या विरुध्द शासकीय कर्मचाऱ्याकडे जो खोटी

माहिती देऊन कार्यवाही करायला लावेल तेंव्हा त्यांनाही शिक्षा केली जाते.

- सार्वजनिक ठिकाणी येण्या–जाण्यास रोखल्यास अथवा अशा ठिकाणी अपमान केल्यास किंवा
- या जातीच्या कुणा महिलेचा विनयभंग करण्याच्या हेतूने बळाचा वापर केल्यास अथवा तिचे शारिरीक शोषण केल्यास किंवा
- त्यांच्याद्वारे उपयोगात आणल्याजाणाऱ्या पाण्याचे ठिकाण घाण केल्यास किंवा
- त्यांना त्यांचे घर किंवा गांव अथवा राहण्याची जागा सोडण्यास भाग पाडल्यास, अशा अपराध्यास किमान सहा महिने व अधिकतम पाच वर्षापर्यंतची कैद व दंड असे दोन्ही होऊ शकते.

भानु : या जातीच्या कुणा व्यक्ती विरुध्द खोटी साक्ष अथवा पुरावा दिल्यास काय शिक्षा होऊ शकते ?

सचिव :
- एखादी व्यक्ती अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीची नसेल व या जाती / जमातीच्या व्यक्ती विरुध्द खोटी साक्ष अथवा पुरावा देईल, ज्यामुळे मृत्यूदंड होऊ शकेल, तर अशी खोटी साक्ष अथवा पुरावा देणाऱ्या व्यक्तीस आजन्म कारावासाची सजा होऊ शकते.
- खोटी साक्ष अथवा पुराव्यामुळे सात वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कैद होऊ शकेल तर अशी खोटी साक्ष अथवा पुरावा देणाऱ्यास सहा महिने ते सात वर्षे पर्यंत शिक्षा होऊ शकते.

शंकर : संपत्तीचे नुकसान केल्यास काय शिक्षा होऊ शकते ?

सचिव : त्यांच्या संपत्तीला आग अथवा एखाद्या विस्फोटक पदार्थाद्वारे नुकसान पोहचविल्यास सहा महिने ते सात वर्षे कैद व दंड दोन्ही होऊ शकते. जर त्यांच्या पुजास्थळास, निवास अथवा संपत्ती ठेवण्याच्या स्थळास आग लावून किंवा विस्फोटकाव्दारे वाईट हेतूने नष्ट केल्यास अपराध्यास शिक्षा होऊ शकते.

कमला : एखाद्या गुन्हयाची माहिती लपविल्यास काय शिक्षा होईल ?

सरपंच : जर एखाद्या व्यक्तीने या अधिनियमाअंतर्गत झालेला एखादा गुन्हा किंवा साक्षीदार यांच्याबाबतची माहिती लपविली व त्यामुळे अपराधी सुटल्यास अशा व्यक्तीस, अपराधासाठी जी शिक्षा निश्चित केलेली असेल, ती शिक्षा होऊ शकते.

मनोहर : शासकीय कर्मचाऱ्याद्वारे अपराध घडल्यास किती शिक्षा होईल?

सरपंच : या कायद्याअंतर्गत अपराध शासकीय कर्मचाऱ्याद्वारे घडल्यास त्यांस एक वर्षे ते घडलेल्या अपराधाबाबत निश्चित केलेल्या शिक्षेपर्यन्तची शिक्षा होऊ शकते. त्यांत भारतीय दंड संहिता १८६० मध्ये निश्चित केलेल्या दंडाप्रमाणे वाढही केली जाऊ शकते.

कमला : कर्तव्याचे पालन न केल्याबद्दल किती शिक्षा होऊ शकते?

सरपंच : जर एखादा शासकीय कर्मचारी अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमातीचा नसेल व या जाती – जमाती बाबत असलेल्या आपल्या कर्तव्यांचे पालन करत नसेल तर

विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी आहेत. या जातीवर कोणत्याही प्रकारचे अत्याचार रोखण्याच्या दृष्टीने कायद्यात कडक प्रयोजन केले गेले आहे.

मोहन : खराब पदार्थ खाऊ अथवा पिऊ घातल्यास किती नुकसान भरपाई मिळते ?

सचिव : खराब पदार्थ खाऊ अथवा पिऊ घातल्यास पिडीतास रु. २५,०००/- वा त्यापेक्षा जास्त रक्कम नुकसान भरपाई म्हणुन अपराध्यास द्यावे लागतात. यापेक्षा अधिक अपमान वा मानहानी सहन करावी लागल्यास त्याप्रमाणात अजून जास्तीची रक्कम नुकसान भरपाई म्हणून द्यावी लागते.

मोहन : जमीनीवर कब्जा करणे, अवैधपणे शेती करणे, परीसर वा पाण्याच्या उपयोगापासून रोखणे या बाबत किती नुकसान भरपाई मिळते?

सचिव : अपराधाच्या गंभीरतेनुसार रु. २५,०००/- वा त्यापेक्षा जास्तीची रक्कम नुकसान भरपाई मिळते. जमीन, परिसर, पाणी याची व्यवस्था शासकीय खर्चाने पूर्ण केली जाते.

कमला : वेठबिगारीने किंवा जबरस्तीने काम करुन घेतल्यास अथवा बंधक बनवून मजुरी करुन घेतल्यास किती नुकसान भरपाई दयावी लागते?

सरपंच : प्रत्येक पिडीतास कमीतकमी रु. २५,०००/- नुकसान भरपाई दयावी लागते. प्रथम माहिती अहवाल दिल्यानंतर २५% रक्कम व खालच्या न्यायालयात दोष सिध्द झाल्यानंतर ७५% रक्कम पिडीताला दिली जाते.

शंकर : खोटी, द्वेषपूर्ण, त्रास देणारी कायदेशीर कारवाई अथवा घाणेरडी माहीती याबाबत नुकसान भरपाईचे काय प्रयोजन आहे ?

सरपंच : पिडीतास रुपये २५,०००/- अथवा प्रत्यक्ष कायदेशीर खर्च आणि नुकसान भरपाई दिली जाते.

शंकर : धमकाविल्यास अथवा अपमान केल्यास नुकसान भरपाईचे काय प्रयोजन आहे ?

सचिव : अपराधाचे स्वरुप विचारात घेऊन प्रत्येक पिडीतास रु. २५,०००/- चा मोबदला दिला जातो. यापैकी २५% रक्कम न्यायालयात आरोप पत्र पाठवते वेळी व उर्वरित रक्कम आरोप सिध्द झाल्यानंतर दिली जाते.

कमला : एखाद्या महिलेचा विनयभंग केल्यास अथवा लैंगीक शोषण केल्यास किती भरपाई द्यावी लागते?

सचिव : प्रत्येक पिडीत महिलेस रु. ५०,०००/- भरपाई द्यावी लागते. ५०% रक्कम वैद्यकीय तपासणी नंतर व उर्वरित ५०% रक्कम दावा निकाली झाले नंतर दिली जाते.

मोहन : पाण्याच्या स्त्रोतास दुषित केल्यास किती मोबदला द्यावा लागतो?

सरपंच : पाणी दुषित / घाण केल्यास रु. १,००,०००/- पर्यंतची रक्कम अथवा पाण्याच्या स्त्रोतास साफ करुन सामान्य सुविधा देण्यास लागणारा संपूर्ण खर्च द्यावा लागतो. प्रकरणातील गंभीरता विचारात घेऊन जिल्हा प्रशासन आपल्या स्तरावर भरपाईची

रक्कम निश्चित करु शकते.

मोहन : रस्त्याच्या पारंपारिक अधिकारापासून वंचित केल्यास मोबदल्याचे काय प्रयोजन आहे ?

सरपंच : : या अधिकारापासून वंचित केल्यास रु. १,००,०००/— पर्यंतची रक्कम अथवा रस्त्याची सामान्य सुविधा देण्यास लागणारा संपूर्ण खर्च व नुकसान भरपाई द्यावी लागते.

५०% रक्कम न्यायालयात आरोपपत्र पाठवितेवेळी व ५०% रक्कम खालच्या न्यायालयात अपराध सिध्द झाले नंतर द्यावी लागते.

कमला : एखाद्यास निवासस्थान सोडण्यास भाग पाडले तर किती नुकसान भरपाई द्यावी लागते?

सरपंच : अशा परिस्थितीत रु. २५,०००/— मोबदला दिला जातो. घर नष्ट केल्यास अथवा जाळल्यास सरकारी खर्चाने वीट/दगडाचे घर पुन्हा बांधुन दिले जाते. संपूर्ण रक्कम न्यायालयात आरोपपत्र पाठविल्यानंतर दिली जाते.


कमला : खोटी साक्ष देण्याच्या प्रकरणांत किती मोबदला द्यावा लागतो?

सरपंच : अशा प्रकरणांत कमीतकमी रु. १,००,०००/— अथवा झालेल्या नुकसानीचा संपूर्ण मोबदला द्यावा लागतो. ५०% रक्कम न्यायालयात आरोपत्र पाठविते वेळी व ५०% रक्कम अपराध (खोटी साक्ष) सिध्द झाल्यावर द्यावी लागते.

मनोहर : खोट्या आरोपात भारतीय दंड संहितेनुसार १० वर्षे वा त्यापेक्षा जास्त सजा झालेल्यास किती मोबदला मिळतो?

सरपंच : अपराधाचे स्वरुप व गांभीर्य लक्षात घेऊन प्रत्येक पिडीतास अथवा त्याच्या आश्रीतास रु.५०,०००/— दिले जातात.

मनोहर : एखाद्या सरकारी कर्मचाऱ्या व्दारे सताविले गेल्यास किती मोबदला मिळतो?



सरपंच : सरकारी कर्मचाऱ्याव्दारे सतावले गेल्याने होणाऱ्या हानीची संपूर्ण भरपाई मिळते. ५०% रक्कम न्यायालयात आरोपपत्र पाठविते वेळी व ५०% रक्कम खालच्या न्यायालयात अपराध सिध्द झाल्यावर दिली जाते.

मनोहर : अत्याचार / अपराधात अपंगत्व आल्यास मोबदल्याचे काय प्रयोजन आहे?

सरपंच :
- १००% असमर्थता आल्यास प्रत्येक पिडीतास कमीतकमी रु. १,००,०००/— दिले जातात.
- कुटुंबाच्या कमवित्या सदस्यास १००% असमर्थता आल्यास प्रत्येक पिडीतास रु. २,००,०००/— दिले जातात. ५०% रक्कम प्रथम खबरी अहवाल व वैद्यकीय तपासणी नंतर दिली जाते. २५% रक्कम न्यायालयात आरोपपत्र

पाठविते वेळी दिली जाते व बाकी २५% रक्कम खालच्या न्यायालयात अपराध सिध्द झाल्यावर दिली जाते.

- जेंव्हा असमर्थता १००% पेक्षा कमी असेल तेंव्हा कमविता सदस्यास कमीतकमी रु. १५,०००/– आणि कमविता सदस्यास रु. ३०,०००/– मिळते.

बुधिया :
- कुटूंबाच्या अकमविता सदस्याची हत्या झाल्यास अथवा त्यास मृत्यू आल्यास प्रत्येक प्रकरणात कमीतकमी रु. १,००,०००/– दिले जातात. ७५% रक्कम शवविच्छेदनानंतर व २५% रक्कम खालच्या न्यायालयात अपराध सिध्द झालेवर मिळते.
- कुटूंबाच्या कमवित्या सदस्याची हत्या झाल्यास अथवा त्यास मृत्यू आल्यास प्रत्येक प्रकरणात कमीतकमी रु. २,००,०००/– दिले जातात. ७५% रक्कम शवविच्छेदनानंतर व २५% रक्कम खालच्या न्यायालयात अपराध सिध्द झाल्यानंतर मिळते.
- हत्या / मृत्यू, नरसंहार, बलात्कार, सामुहिक बलात्कार, स्थायी असमर्थता व डाका झाल्यास खालील मदत दिली जाते.
  - अत्याचाराच्या तारखेपासून ३ महिन्याच्या आत मयताची विधवा अथवा इतर आश्रीतांना रूपये एक हजार दरमहा या दराने अथवा मयताच्या कुटूंबाच्या एका सदस्यास रोजगार किंवा शेत जमीन, गरज असल्यास एक घर तात्काळ विकत घेवून दिले जाते.
  - पिडीतांच्या मुलांच्या शिक्षणाचा व पालणपोषणाचा संपूर्ण खर्च दिला जातो. मुलांना आश्रमात, विद्यालयात, अनिवासीय विद्यालयात दाखल केले जाते.
  - तीन महिन्यापर्यंत भांडी, तांदूळ, गहू, डाळ, धान्य इ. ची व्यवस्था केली जाते.

बुधिया : अनुसूचित जाती व अनुसूचीत जमाती (अत्याचार निर्मुलन) कायदा, कलम ३ नुसार वन – अधिकार काय काय आहेत?

सरपंच : व्यक्तीगत तसेच सामुहिक स्वरुपात वनभूमीवर राहणाऱ्या ज्या लोकांना वन–अधिकार दिले गेले आहेत ते खालीलप्रमाणे आहेत.

- राज्य वा राज्याच्या त्या क्षेत्रात राहणाऱ्या त्यासर्व घोषीत जनजाती ज्या वनावर आश्रीत आहेत.
- इतर पारंपारीक वनवासी.

बुधिया : उपरोक्त अधिनियमाच्या कलम ४ (१) अनुसार दिले जाणारे व्यक्तीगत वन – अधिकार कोणकोणते आहेत?

सरपंच : व्यक्ती व सामुहिक व्यवसाय करणाऱ्या लोकांना निवास वा शेतीसाठी वनभुमीत

राहण्याचा अधिकार आहे. व्यवसायासाठी जमीनीचा उपयोग हे लोक करु शकतात

- व्यक्ती
- परिवार
- समुदाय

बुधिया : या कायद्याअंतर्गत काय काय अधिकार आहेत?

सरपंच :
- या कायद्याअंतर्गत अधिकतम चार हेक्टर जमिनीवर हक्क सांगितला जाऊ शकतो.
- समुदायास मासळी, नदी, तलाव व पारंपारीक साधन सुविधावर पूर्ण अधिकार आहे.
- निवासावर समुदायाचा अधिकार आहे.



बुधिया : जैविक विविधता आणि सांस्कृतिक विविधता यांच्या रक्षणाबाबत काय कायदा आहे?

सरपंच : अनुसूचित जनजाती व वनवासी यांना या सर्वावर अधिकार आहे –
- छोटे कालवे,
- ऊर्जेचे अपारंपारिकस्त्रोत
- व्यवसायीक प्रशिक्षण केंद्र
- रस्ते
- सामुदायीक केंद्र
- जैविक विविधतेच्या बौध्दीक संपदा

आणि पारंपारिक ज्ञान विकसित करण्याचा अधिकार



बुधिया : वनभूमिचे परिवर्तन केंव्हा केले जाते?

सरपंच : परिवर्तन तेंव्हा केले जाते, जेंव्हा–
- एखाद्या प्रकारणांत वनभूमिचे क्षेत्रफळ १ हेक्टर पेक्षा कमी असेल आणि
- ग्रामसभेने त्या परियोजनेस स्विकृती दिली असेल.
- प्रति १ हेक्टर जमीनीतुन ७५ पेक्षा जास्त वृक्ष कापले जाणार नाहीत.

बुधिया : सामुदायिक वनसामग्री बाबत काय कायदा आहे?


सरपंच :
- आपल्या सामुग्रीची सुरक्षा, व्यवस्था व त्यांना उपयोगी स्वरुपात ठेवण्याचे संपूर्ण अधिकार अनुसूचित जनजातीला देण्यात आले आहेत.
- त्यांना सांस्कृतिक आणि पारंपारिक रितीरिवाज कायम ठेवण्याचे अधिकार आहेत.
- स्थापीत केले गेलेले ते अधिकार जे बनविले गेले आहेत.
- एखाद्या राज्याच्या कायद्यानुसार
- स्वयंशासित जिल्हा परिषदेद्वारे

- स्वयंशासित क्षेत्रीय परिषदेद्वारे

बुधिया : लघु – वन पदार्थांच्या वाहतुकीच्या बाबतीत काय कायदा आहे?

सरपंच : आपल्या जिवेकीसाठी लघु – वन पदार्थ गोळा करणाऱ्या व्यक्ती अथवा समुदायांना खालील साधणे संघटित करता येतील.

- सायकल, टोपले,
- हातगाडा
- वन्यक्षेत्रात संग्रह होण्यासाठी मोटर चालित वाहनाचा उपयोग निशिध्द आहे.



बुधिया : या कायद्यात कोणकोणते पारंपारिक अधिकार येत नाहीत?

सरपंच : शिकार अथवा एखाद्या वन्य प्राण्याला पकडणे अथवा एखाद्या वन्य प्राण्याच्या एखाद्या अवयवाचा उपयोग करणे.

बुधिया : केंद्र शासनाला एखाद्या वन्य भूमीच्या परिवर्तनाचा अधिकार आहे का ?

सरपंच : खालील सुविधांसाठी केंद्र शासनाला असा अधिकार आहे.

- शाळा व अंगणवाडी
- दवाखाना अथवा आरोग्य केंद्र
- योग्य वस्तूचे दुकान
- वीज व दुरध्वनी तारा
- पाण्याची टाकी,
- पाण्याची पाईपलाईन व पिण्याच्या पाण्याने वितरण
- जल अथवा पावसाच्या पाण्यावरची शेती

# ४.अनुसुचित जमाती व इतर पारंपारीक वनवासी (वन अधिकारांना मान्यता) अधिनियम २००६ व नियमावली २००७

सरपंच :
- अनुसुचित जमाती व इतर परंपरागत वनवासी वर्षोनुवर्षे वनांमध्ये रहात आलेले आहेत. त्यांनी नेहमीच वनांचा सांभाळ केलेला आहे, त्यांचे रक्षण केलेले आहे. आपल्या परंपरेनुसार वनांना वाचविण्यात त्यांचे महत्वपुर्ण योगदान आहे. वनांना संपादीत करतेवेळी त्यांच्या वडीलोपार्जीत जमीनी, वनअधिकारांना व त्यांच्या निवासस्थानांना योग्य स्वरूपात मान्यता न मिळाल्याने त्यांच्यावर घोर अन्याय झाला आहे.
- या अंतर्गत त्या जनजातीही समाविष्ठ आहेत ज्यांना विकासाच्या नावाखाली नाईलाजाने आपला निवास दुसरीकडे करावा लागला होता. खुप कालावधीपासुन चालत आलेल्या भूमी संबंधी असुरक्षिततेला समाप्त करण्यासाठी वनअधिकार अधिनियम, २००६ व २००७ तयार केले आहेत.

कमला : वन अधिकार अधिनियमाअंतर्गत अनुसुचित जाती व इतर परंपरागत वनवासी यांना कोणते कायदेशीर अधिकार मिळाले आहेत ?

सरपंच : त्यांना खालील कायदेशीर अधिकार मिळाले आहेत :
- डिसेंबर २००५ च्या पुर्वीपासुन कब्जेदार असलेल्या सर्व अधिवासींना वनभूमीचे अधिकारपत्र मिळेल.
- तीन पिढयांपासुन (७५ वर्षे) वनांमध्ये रहात असलेल्या इतर जातींच्या परंपरागत वनवासींनाही अधिकारपत्र मिळेल.
- गाव, वसाहत व सामुदायिक वनभूमीचाही मालकी हक्क मिळेल.

मनोहर : वहीवाटीच्या जमीनीबाबत काय नियम आहेत ?

सचिव :
- राज्याच्या नियमानुसार वनवासींना वहीवाटीने सर्व अधिकार मिळतील.
- परंपरागत जलाक्षय, तलाव, मासळी व जलाक्षयापासुनचे अन्य उत्पादनांवर अधिवासींचा अधिकार असेल.
- वनवासींना सर्व प्रकारचे लघु—वनउत्पन्न(जसे तेंदूपाने, बांबू, वाळलेले वृक्ष,वेत, मेन, मध, औषधीमुळया, औषधीवृक्ष, कंदमुळ, दगड, गिट्टी, मुरूम इत्यादी) गोळा करणे, वापर करणे व विकण्याचा अधिकार राहिल.
- गावापासुन ते बाजारापर्यंत लघु वन उत्पादन डोक्यावरून, सायकलवरून अथवा हातगाडीवरून वाहून नेण्याचा अधिकार असेल. या कायदयाद्वारे बाबूला स्पष्टपणे लघु वन उत्पदनाच्या श्रेणीत समाविष्ठ केले आहे.

- समुदायाच्या परवानगीशिवाय जलाक्षयांचा परवाना दुसऱ्यांना दिल्या जाणार नाही.

कमला : वनभूमीला दुस–या कोणत्या कामाच्या उपयोगात आणल्या जाउ शकते का ?

सरपंच : शाळा, दवाखाना, अंगणवाडी, शिधा वाटप केंद्र, छोटे जलाशय, वीज, पाणी, रस्ते, प्रशिक्षण केंद्र, सार्वजनिक भवन यासाठी वनभूमीचे परिवर्तन करण्याचा अधिकार ग्रामसभेला आहे. परंतु अशी जमीन अडीच एकर पेक्षा जास्त नसावी व या कार्यासाठी पंच्याहत्तर पेक्षा जास्त झाडे कापावी लागु नयेत.

बुधिया : जिथे आदी जमातींचा निवास आहे, त्यावर कुणाचा अधिकार असेल?

सरपंच :
- आदी जमातींच्या वसाहतींना मालकी हक्क असेल.
- वनांमध्ये स्थित सर्व प्रकारच्यावस्ती व वनग्रामांना व्यवस्थापीत व राज्य ग्रामात बदलण्याचे प्रयोजन आहे.

कमला : वनविभागाद्वारे हटविले गेलेले आधिवासी पुन्हा त्याच निवासस्थावर येऊन राहू शकतात का?


सरपंच :
- जर एखादया अधिवासींना १३ डिसेंबर २००५ पुर्वीच्या स्थितीत वन विभागाने हटविले असल्यास व त्यास मोबदला अथवा पुनर्वास मिळाला नसल्यास तो पुन्हा आपल्या पहिल्या ठिकाणी येउन निवास करू शकतो.
- एखादया राज्याद्वारे विकास योजनेकरिता जंगलाची जमीन घेतली गेली व संपादनानंतर पाच वर्षांच्या आत योजनेची अंमलबजावणी सुरू झाली नाही व या कारणामुळे अधिवासी किंवा वनवासी त्या वस्ती व शेतीतुन विना मोबदला विस्तापित झाले असतील तर त्यांना त्या जमीनीवर अधिकार प्राप्त होतात.
- एखाद्या वनात रहाणाऱ्या अधिवासी वा इतर परंपरागत वनवासींना तो पर्यंत बेदखल केला जाणार नाही, जो पर्यंत ती मान्यता व संपादनाची प्रक्रिया पुर्ण केली जाणार नाही.

मोहन : अनुसुचित जमाती व अन्य परंपरागत वनवासी यांची कर्तव्य काय आहेत?

सचिव : अधिकाराबरोबरच त्यांची कर्तव्येही खालीलप्रमाणे निश्चित केलेले आहेत–
- वने, वन्यप्राणी, पशु, महत्वाची झुडुपे इत्यांदीचे रक्षण करणे.
- वनक्षेत्रातील जलाशयांचे रक्षण करणे.
- ग्रामसभेत असे निर्णय घेतले जाणार नाहीत की ज्यामुळे वन्यप्राणी, बिशिष्ट वन्य वनस्पती व वन्यपशुंवर विपरीत परिणाम होईल.

मनोहर : वन अधिकार प्राप्त करण्यासाठी कुठली पध्दत अवलंबावी लागते?

सचिव : वन अधिकार प्राप्त करण्यासाठी वनवासीला



ग्रामपंचायतमध्ये लेखी दावा करावा लागतो. पंचायत खालील प्रक्रिया अवलंबेल –

- पंचायतस्तरावर विशेष ग्रामसभेचं आयोजन करून वन अधिकार समिती स्थापन केली जाईल, ज्यात दोन तृतीयांश म्हणजेच ६७% ग्रामसभा सदस्य कोरम पुर्ण होण्यासाठी उपस्थित असणे आवश्यक राहील.

मनोहर : समितीत किती सदस्य असतील?

सचिव :
- या समितीत दहा ते पंधरा सदस्य असतील. पैकी किमान पाच आदिवासी व पाच महिला असणे आवश्यक आहे.
- या समितीत एक अध्यक्ष व सचिव असतील. सचिव पदावर पंचायत सचिव व पंचायत कर्मचारी यांना समाविष्ठ करण्याचे प्रयोजन आहे.
- ग्रामपंचायतचे इतर पंच, सरपंच व कुणा शासकीय कर्मचा–याला वनअधिकार समितीत समाविष्ठ करणे बंधनकार नाही.

कमला : ग्रामस्थ वनभूमीवर आपला दावा कसा प्रस्तुत करेल ?

सचिव :
- दावा स्विकारण्याबाबत ग्रामसभेद्वारे वनअधिकार समितीला अधिकार दिल्यानंतर ग्रामस्थ आपला दावा निर्धारीत स्वरूपात ग्रामपंचायत कार्यालयात दाखल करू शकतील. या अर्जासोबत आपल्या ताब्याबाबत जो काही साक्षी / पुरावा असेल, तो जोडणे आवश्यक आहे.
- एक प्रत वन अधिकार समितीला देऊन दुसऱ्या प्रतीवर शिक्का घेऊन पोचपावती आपल्या जवळ सुरक्षित ठेवावी.

कमला : ताब्याच्या दावेदारांचे प्रस्ताव कसे पारीत केले जातात?

सरपंच :
- ताब्यांच्या दाव्यांची योग्यता निश्चित करून ग्रामसभा ते प्रस्ताव उपखंड स्तरावरील समितीकडे पाठविते.
- ग्रामसभेकडून प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावांचा अभिलेख उपखंड स्तरावरील समिती तयार करेल व अंतिम निर्णयासाठी जिल्हा समितीकडे पाठवेल.

मनोहर : दाव्याचा अंतिम निर्णय कोण करतो?

सरपंच :
- व्यक्तीगत आणि सामुदायिक प्रकारच्या सर्व दाव्याच्या योग्यतेसंबंधी अंतिम निर्णय जिल्हा स्तरीय समिती घेते.
- प्रत्येक परिवाराला त्यांचा वनभुमिवर जेवढा ताबा आहे तेवढयाच अधिकार १० एकर सिमेअंतर्गत मिळेल.
- हा अधिकार पति – पत्नी या दोघांच्या संयुक्त नामे अथवा दोघांपैकी जो जिवंत असेल, त्याच्या नावे असेल.
- अधिकाराची जमिन ना कोणाला विकता येते ना कोणाच्या नावे केल्या जाऊ शकते. (आपल्या मुलांना वगळून)

बुधिया : वनअधिकार कायद्या अंतर्गत ग्राम सभेचे कार्य काय आहे?

सचिव : ग्रामसभेचे कार्य खालील प्रमाणे आहे –

- वनअधिकारचे क्षेत्र व सिमा निश्चित करण्याच्या कार्यसंबंधीच्या दाव्याची सुनावणी ग्रामसभा करेल.

बुधिया : दाव्याच्या चौकशीत कोणत्या पुराव्याची आवश्यकता असते?

सचिव :
- कुठलाही दावा दोन पुराव्यासोबतच दाखल केल्या जाईल. (पुराव्यात राजपत्र, जणगणना, नकाशा, वनअभिलेख, भाडेपट्टा, सरकारी आदेश, अधिसुचना, सरकारी अभिलेख, मतदान ओळख पत्र, शिधापत्रिका, न्यायालयाचा निर्णय, तात्कालीन राजाकडुन प्राप्त झालेले अभिलेख, पुर्वजांची वंशावळ अथवा दावेदाराव्यतिरीक्त इतर वृध्दांचे जबाब)
- शासकीय नियमाप्रमाणे ग्रामसभा आपल्या नोंदवहीमध्ये संपूर्ण माहिती नोंदवेल.
- वनअधिकारासंबंधीत दाव्याच्या चौकशी कामी योग्य वेळ देवून ग्रामसभा प्रस्ताव पारित करेल व तो प्रस्ताव उपखंडस्तरीय समितीकडे पाठवेल.

कमला : ग्रामसभेच्या निर्णयावर कोणी नाराज असेल तर त्याने काय करायला पाहिजे?

सचिव :
- ग्रामसभेच्या प्रस्तावावर जर कोणी नाराज असेल तर ती व्यक्ती प्रस्ताव पारित झाल्यापासून ६० दिवसाच्या आत उपखंडस्तरीय समितीकडे अर्ज देवू शकते.
- उपखंडस्तरीय समितीच्या निर्णयाच्या दिवसापासून ६० दिवसाच्या आत जिल्हा स्तरीयसमितीकडे अर्ज देता येतो.
- जिल्हा स्तरीय समितीचा निर्णय अंतिम तसेच बंधनकारक असेल.

# पंचायत राज्य

# १. कथा:– पंचायती पासून मिळाली प्रेरणा

शिरगांव हे एक शहरापासुन वेगळं छोटसं गांव होत. काही बाबतीत या गावची वेगळी अशी ओळख होती. गावकऱ्यांनी आपल्या गावात हिरवळ जपून ठेवली होती. पंचायतने आपल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या नव्हत्या तरी सुध्दा गावकरी आपल्या उज्वल भवितव्यासाठी कामात गढले होते. आपल्या आड विहिंरीना व तलावांना त्यांनी जतन करून ठेवले होते. पंचायत कडून जेवढी मदत मिळायला पाहिजे होती तेवढी त्यांना मिळत नव्हती. पंचायत कार्यालयात नेहमी उदासिनता पसरलेली असे. कार्यालयात सरपंच भीमराव महिना महिना येत नसत. परंतु उपसरपंच शंकरराव अवश्य कार्यालयात येत–जात होते. पंचायतीचा नायकच झोपलेला होता, त्यामुळे पंचायत सुध्दा अर्धी झोपलेली होती. काही प्रमाणात लोखंड खराब होते, तर काही प्रमाणात लोहार.



सरपंच भीमरावांचे त्यांची पत्नी नर्मदाशी कधी पटत नव्हते.लग्नाला तशी ६ वर्ष झाली होती. दोन मुल सुध्दा होती. परंतु भीमरावांच्या कारस्थानांमुळे त्यांच्या पत्नीशी त्यांचे पटत नव्हते. पंचायतीमध्ये केलेल्या उलटया सुलटया कामाच्या चौकशीत पूर्ण दिवस जात होता. भीमरावांची चिडचिड होत होती व ते रागानेच घरातून बाहेर पडत होते. घरात रागराग वाढत होता. पाणी डोक्यावर जाऊ लागले, तेव्हा नर्मदा आपल्या दोन्ही मुलांसोबत माहेरी निघून गेली.



गावात हळूहळू कुजबूज होवू लागली. सरपंचाला बदलले पाहिजे. लोक इथपर्यंत म्हणायला लागले की, जो सरपंच आपला 'संसार चालवू शकत नाही. तो गांव काय चालवणार.

'सरकारने गावकऱ्यांची ही अडचण दूर केली. शिरगावचे सरपंच पद हे महिलांसाठी राखीव घोषित करण्यात आले.

भिमराव घराबाहेर हातात वर्तमानपत्र घेऊन गुपचूप मनातल्या मनात विचार करीत होते.

"सरपंच पदाचे फक्त सहा महिने राहिले होते. पत्नी गेली आता सरपंच पद सुध्दा जाणार

आहे. ताठ मानेने चालायचे दिवस गेले. पूर्ण गांव माझ्या विरूध्द गेले आहे. थोडी फार बचत केलेली होती तीसुध्दा आता संपेल.

याच दरम्यान उपसरपंच शंकरराव त्या ठिकाणी पोहचले आणि म्हणाले "रामराम सरपंच साहेब.''

या शंकरराव "बसा" भीमराव म्हणाले.

जवळ असलेल्या खुर्चीवर बसत शंकररावांनी भीमरावांच्या जखमेवर मीठ चोळले आणि म्हाणाले, "वर्तमानपत्र वाचले का?..... शिरगावात आता महिला सरपंच होणार!"


"होय वाचले भाऊ, बसल्या बसल्या हाच विचार करत होतो आता आपण काय करायचं?"

"शंकरराव आपली खुर्ची सरकवत म्हणाले सरपंच साहेब आपली ईच्छा असेल तर एक मार्ग आहे."

"काय?"

"वहिनींना घेऊन या...... निवडणूक लढवा." निवडून आणायची जबाबदारी आमची. सरपंच पद घरात राहील. साप मारला जाईल आणि काठी सुध्दा मोडणार नाही."

"भीमरावांना वाटले कुणीतरी त्यांच्या कानात गरम तेल ओलते.



"नाही शंकरराव हे नाही होऊ शकत"

"का"?

"स्मशांनात गेलेला मुडदा परत येऊ शकत नाही."

"अरे भाऊ कसल स्मशान अन कसला मुडदा. आपला परिवार आहे आपली मुले आहेत. दोन मैलांचा विचार करू नका, शंभर मैलांचा विचार करा. सरपंचपद घरातल्या घरात राहील. पूर्ण गावात नाना प्रकारच्या गोष्टी होत आहेत. त्यांच तोंड बंद होईल."

"पण ............"

"पण, परंतु सोडा. माझं ऐका. वहिनींना पटकन घेऊन या."

शंकररावांचे बोलणे ऐकून भीमरावांचा राग थोडा शांत झाला. ते म्हणाले, पण मी कोणत्या तोंडाने जाऊ? दोन वर्षापासून साधी चिठ्ठी सुध्दा पाठविलेली नाही.

"सकाळी बाहेर गेलेला संध्याकाळी घरी आला तर त्याला कोणी काही म्हणत नाही." भाऊ मुलांमुळेच परिवार आहे, इज्जत आहे. आणि सहा महिन्यानंतरचा विचार करा की, सरपंचपद गेले तर मिशा खाली करून चालावे लागेल. वहिनी तर सुखात राहतील शिकल्या सवरलेल्या

आहेत. पूर्ण गाव आज सुध्दा त्यांची आठवण काढते. मी तुमच्या फायदयाचे बोलत आहे भाऊ. पुढे तुमची मर्जी ठीक आहे मी आता चालतो राम--राम" ......... शंकरराव निघून जातात.

रात्र वाढत चालली होती. भीमरावांना झोप येत नव्हती. जाऊ का नको जाऊ.......... ! याच विचारात त्यांची रात्र निघून गेली.

सकाळ होता होता भीमरावांनी बायकोच्या माहेरी जाण्याचा विचार पक्का केला. शेवटी सरपंचाच्या खुर्चीला चिटकून राहण्याचा त्यांना मोह होता.



संध्याकाळ पर्यंत भीमराव आपल्या सासुरवाडीला पोहचले. सासरवाडीतील लोक आश्चर्य चकीत झाले. ते नाराज नक्कीच होते, परंतू जावई घरी आल्यामुळे सर्व मतभेद संपले. परंतु नर्मदा त्यांच्या सोबत जायला तयार नव्हती. वडील, बहीण, भाऊ सगळेजण समजावून सांगत होते. नर्मदा थोडी सुध्दा विचलित झाली नाही. आईने तिला एका वेगळया खोलीत नेऊन समजावले.

"हे बघ मुली मी तुझी आई आहे. .......... तुला जन्मभर सोबत ठेवून खाऊ पिऊ घालू शकते. मी तुझा त्रास व दु:ख सुध्दा समजू शकते."

नर्मदा म्हणाली, "आई तुला समजत नाहीये, त्यांना सरपंच पदाची गरज आहे .......... माझी नाही."

आई म्हणाली "ते तर मला सुध्दा समजतय, परंतु हिच वेळ आहे निर्माण झालेली समस्या सोडविण्याची.

"ती कशी"

"सासरी जाऊन तू निवडणूक लढव. सरपंच बनून दाखवून दे की तु शिकली सवरलेली आहेस, सरपंचपद मिळताच तुझ्या हातात सत्ता येईल. मग तुला किंवा तुझ्या मुलांना कुणीही त्रास देऊ शकणार नाही. मला पूर्ण विश्वास आहे. तू गावाला सुध्दा सुधारू शकतेस आणि या नालायकाला सुध्दा! तू जा, शिरगावला, तुझी आवश्यकता आहे मुली! ''

नर्मदाला आईचे बोलणे थोडे थोडे लक्षात यायला लागले. तिला वाटू लागले शिरगावला जाण्यातच भले आहे.

नर्मदा आपल्या मुलांना घेऊन शिरगावात परत आली. भीमरावांना तिचे येणे चांगले वाटले असो किंवा नसो परंतु गाववाले खूप खुष होते. ते नर्मदाला मान देत होते. एक तर ती शिकली सवरलेली होती आणि सामाजिक कार्यात रस घेऊन काही ना काही करत होती.

पाहता पाहता सरपंच पदाची निवडणूक जवळ आली. नर्मदाने निवडणूकीसाठी अर्ज भरला. नर्मदा गावाच्या भल्यासाठी सरपंच होऊ इच्छित होती परंतू भीमराव तिला खुर्चीसाठी

सरपंच करू इच्छित होते. सरपंच पदासाठी गावकऱ्यांच्या जिभेवर नर्मदाचेच नाव होते.



निवडणूकीचा दिवस उजाडला आणि नर्मदा बिनविरोध निवडून आली.

पूर्ण गांव आनंदोत्सव साजरा करीत होते. पंचायत कार्यालयावर सरपंचाच्या समोर भीमराव नाव काढून "श्रीमती नर्मदा" असे नाव लिहिले गेले.

आता परिस्थिती पूर्णपणे बदलली होती. नर्मदा आता सरपंच होती. भीमरावांच्या जागेवर नर्मदा होती आणि नर्मदाच्या जागेवर भीमराव पंचायत कार्यालय नवीन पध्दतीने सजवले गेले. लोकांचे येणे जाणे वाढले. नर्मदा आपला जास्त वेळ पंचायत मध्ये घालवत होती.

जनतेच्या सहभागातून काही योजना तयार होत होत्या. महिलांच्या बैठका होत होत्या. ग्रामसभा व्यवस्थित पध्दतीने आयोजित केल्या जात होत्या. कुठे वृक्षारोपण तर कुठे जलभरण होत होते.

गावातील शाळेत शिक्षक वेळेवर येऊ लागले. जनावरे चारायला जाणारी मुले आणि मजुरी करणारी मुले शाळेत जाऊ लागली. पंचायत मधील सर्व कामे गतीमान झाली. परंतु अचानक एक दिवस आश्चर्यकारक घटना घडली. नेहमीप्रमाणे पंचायत कार्यालय सकाळी दहा वाजता उघडले. कार्यालय उघडताच भीमराव आत येऊन सरपंचाच्या खुर्चीवर बसले. कार्यालयातील सर्व लोक आश्चर्यचकित झाले. घाबरले सुध्दा होते. त्यांच्या काही लक्षात येत नव्हते. तेंव्हाच नर्मदाने अचानक प्रवेश केला. भीमराव सरपंचाच्या खुर्चीवर बसलेले पाहून ती अचंबित झाली. ती शांतपणे म्हणाली,



"ही सरपंचाची खुर्ची आहे, आपण समोर बसावे."

भीमरावांना खूप वाईट वाटले. ते उभे राहिले व नर्मदाकडे रागाने पहात कार्यालयाच्या बाहेर निघून गेले. नर्मदाने हसून तो प्रसंग तिथेच संपवला.

नर्मदाला येणाऱ्या वादळाची कल्पना होती. ती घरी पोहोचताच भीमराव ओरडले.

"तू स्वत:ला काय समजतेस? सरपंचपदाच्या गुर्मीत राहू नकोस."

"तुम्हाला कालच्या घटनेविषयी वाईट वाटले असेल, जरा विचार करा कार्यालयातील लोक काय म्हणतील. "काही नाही शेवटी मी सुध्दा या अगोदर सरपंच राहिलेला आहे. माझं ऐक हे सरपंचाचे काम बायकांचे नाही. उद्यापासून बाहेरचे सर्व कामकाज मी पाहणार तू घर सांभाळ.

बायकांची जागा चूल आणि मूल सांभाळण्याची आहे."

नर्मदाने हसून आपला राग गिळून टाकला व म्हणाली "घर तर मी सांभाळतेच आहे, की तुम्ही सांभाळत आहात?"

"जास्त बोलू नकोस, पंचायतचे सगळे काम उद्यापासून मीच पाहणार... बस्स."

नर्मदेच्या संयमाचा बांध फुटला.

"हे बघा खूप झालं. तुमच्यापेक्षा जास्त शिकली सवरलेली आहे. नियम कायदे सर्व माहित आहेत. जे माहीत नाही ते शिकून घेईन. तुम्हाला सरपंचपदाच्या कामात ढवळाढवळ करण्याची गरज नाही. सरपंचपद आपल्या बापदादांची मक्तेदारी नाही. आम्ही जनतेचे सेवक आहोत. जनतेने आम्हाला पूर्ण विश्वासाने निवडून दिलेले आहे."

तेव्हाच अचानक शंकरराव आले.

"या भाऊ, बसा" नर्मदा म्हणाली. काय भानगड आहे जोरजोरात आवाज येत होता?" शंकररावांनी विचारले. नर्मदा म्हणाली, "काही नाही भाऊ थोडाफार वाद–विवाद होत असतो. मी तुमच्यासाठी चहा बनवून आणते हं!"

नर्मदा चहा करण्यासाठी निघून गेली.

शंकररावांनी बाहेरून सर्व एकले होते. ते म्हणाले, "भीमराव आपले हसे का करून घेताय? का चुका करता. तुम्हाला कार्यालयात जाण्याची काय आवश्यकता होती? भीमराव म्हणाला "का जाऊ नको? शेवटी ती माझी बायको आहे."



"बरोबर आहे" शंकरराव म्हणाले. खुर्चीचा मोह तुम्हाला सुटत नाही. ती तुम्हाला केव्हाही आत टाकू शकते. बेसावध राहू नका. ती सरपंच आहे कलेक्टर सुध्दा त्यांच ऐकतात.

"भीमरावांना राग अनावर झाला होता, ते म्हणाले, अहो मी ठरवले तर."



"बस्स बस्स तुम्ही काही ठरवू नका. अशा पत्नीचे पाय धुवून ते पाणी प्या. ती पंचायत सांभाळते आणि घरसुध्दा" असे तिने काय केले की तुमची एवढी चिडचिड होत आहे? पूर्ण गावच नाही तर आजुबाजूची गावंसुध्दा तिची स्तुती करत आहेत. अहो यामुळे तर तुमची सुध्दा मान उंचावलेली आहे ना? तुम्ही आपल्या घरापासून खूप दूर गेलेला आहात. आता परत या.

भीमराव शांत झाले. नर्मदा चहा घेऊन आली. शंकरराव चहा पिऊन निघुन गेले.

त्या दिवसा नंतर भीमराव नर्मदाला चांगलेच ओळखू लागले. त्यांच्या बोलण्यात बदल होऊ लागला. ते आपल्या मुलांसोबत सुध्दा बोलू लागले.

एक दिवस भीमराव पहिल्यादांच आपल्या पत्नीजवळ गेले आणि म्हणाले, "आज आठवण करून देणार नाहीस, आज आपल्या लग्नाचा वाढदिवस आहे."

नर्मदा काहीही बोलली नाही फक्त हसली. भीमरावांनी एका कपडयात गुंडाळलेली भेटवस्तू पुढे केली व म्हणाले. "हे घे."



नर्मदाने भेटवस्तु वरील कापड बाजूला केले. त्यामध्ये एक पुस्तक होते त्यावर लिहिलेले होते. "पंचायत राज्य आमचे राज्य ''

खूप दिवसानंतर भीमराव नर्मदाच्या डोळ्यात पाहून हसले.

पंचायत विषयी नर्मदेला आगोदरच खूप काही माहित होते. परंतू जेव्हापासून "पंचायत राज्य आमचे राज्य" हे पुस्तक तिला मिळाले तेव्हापासून ते पुस्तक तिच्या दैनंदिनीचा एक भाग बनून गेले.

पंचायती राज्यचे सर्व बारकावे नर्मदाच्या लक्षात आले होते. तिचे स्वप्न होते की, पंचायतमधील सर्व सदस्यानी पंचायत मधील बारकावे लक्षात घ्यावेत. एक दिवस शिरगावामध्ये ग्रामसभा आयोजित केली गेली. ही योग्य वेळ होती. नर्मदाचे स्वप्न साकार होणार होते.

गावकऱ्यांनी नर्मदाला जे प्रश्न विचारले त्यांची तंतोतत उत्तरे तिने दिली.

# २. पंचायत राज्य : ७३ वे संशोधन



नर्मदा : सन १९९२ ला संसदेत भारतीय घटनेत सुधारणा करून व्यवस्था करण्यात आली की, आता गावाची व्यवस्था गांवातील लोक करतील. यालाच घटनेचे ७३ वे संशोधन आधिनियम १९९२ म्हटले जाते. या आधिनियमानुसार, राज्यात पंचायत राज्य म्हणजेच ग्रामस्वराज्य अधिनियम बनवले गेले. केंद्र आणि राज्य सरकारच्या या अधिनियमानुसार पंचायतचे कामकाज चालते. या अधिनियमानंतर आमच्या देशात तीन प्रकारच्या लोकतंत्र संस्था आहेत.

- पहिली संस्था संसद आहे. संसदेत दोन भाग आहेत. पहिली लोकसभा आणि दुसरी राज्यसभा लोकसभेत आम्ही खासदार निवडून पाठवतो. ससंद पुर्ण देशासाठी कायदे बनवते. आणि एक मंत्रीमंडळ बनवून पूर्ण देशाचे सरकार चालवते. याचे कामकाज दिल्लीहून चालते.
- दुसरी संस्था राज्य स्तरावर आहे. याला विधानसभा म्हणतात. यामध्ये आम्ही आमदार निवडून पाठवतो. विधानसभा राज्यस्तरावर कायदे बनवते आणि एक मंत्रिपरिषद बनवून राज्यव्यवस्थेचे सरकार चालवते.
- तिसऱ्या संस्थेला पंचायत राज्य म्हणतात. ही जिल्हा स्तरावर काम करते. पंचायत राज्यचे आयोजन तीन प्रकारे होते. जिल्हास्तरावर, जिल्हापंचायत, तालुकास्तरावर विकासखंड तालुका पंचायत आणि गावस्तरावर ग्रामपंचायत आता आपण सांगा की मागील निवडणूकीत आपण कोणकोणत्या पदासाठी मतदान केले होते?

पंचायती राज्य व्यवस्था

जिल्हा पंचायत — प्रत्येक जिल्हास्तरावर होते

तालुका पंचायत | तालुका पंचायत | तालुका पंचायत — प्रत्येक विकासखंड स्तर वर होते

ग्राम पंचायत | ग्राम पंचायत | ग्राम पंचायत | ग्राम पंचायत | ग्राम पंचायत | ग्राम पंचायत | ग्राम पंचायत | ग्राम पंचायत | ग्राम पंचायत — प्रत्येक ग्रामपंचायत स्तर वर होते

# ३. ग्रामसभा

सभेतून एक गावकरी म्हणतो मागील निवडणूकीत आम्ही चार पदासाठी मतदान केले होते. एक आपल्या वॉर्डाच्या सदस्यासाठी, दुसरे ग्रामपंचायतच्या सरपंचपदासाठी तिसरे तालुका पंचायत समिती सदस्यासाठी आणि चौथे जिल्हा परिषद सदस्यासाठी.

नर्मदा : तुम्ही अगदी बरोबर सांगितले वॉर्डाचे सदस्य (पंच) आणि सरपंच मिळून ग्रामपंचायत बनते. तलुका पंचायत समिती तयार करण्यासाठी पंचायत समिती सदस्य निवडले जातात. जिल्हा परिषदेसाठी जिल्हा परिषद सदस्य निवडले जातात.

नर्मदा : पंचायत राज्यामध्ये एक अजून संस्था आहे तिला ग्रामसभा म्हणतात आपल्यापैकी कोण सांगेल का ग्रामसभेचे सदस्य कोण असतात?

राम : ग्रामसभेचे सदस्य पंच आणि सरपंच असतात.


इकबाल: नाही, पंच आणि सरपंच हे ग्रामपंचायतचे सदस्य आहेत. ग्रामसभेचे सदस्य गावातील लोक ज्यांचे वय १८ किंवा त्यापेक्षा अधिक आहे.

नर्मदा : आपण अगदी बरोबर बोललात. ग्रामसभा गावातील मतदारांच्या मधून तयार होते. आणि विधानसभा आणि लोकसभा यांच्या प्रमाणे फक्त पाच वर्षापर्यंतच राहात नाही तर त्यांचे सदस्यपद आजीवन असते. ग्रामसभा ही भारतीय गणतंत्राचा एक चागंला नमुना आहे की जी फक्त जनतेच्या सल्ल्यानेच काम करते.

श्याम : याचा अर्थ असा की आम्हीसुध्दा ग्रामसभेचे सदस्य आहोत.

नर्मदा : होय, गावातील सर्व सज्ञान लोक ग्रामसभेचे सदस्य आहेत. आता आपण सांगा की, आपण ज्या संस्थेचे सदस्य आहोत. तिचे नियम कायदे माहित नसल्यास त्याच्यात भाग कसा घ्याल?

श्याम : मला आज माहित झाले की मी ग्रामसभेचा सदस्य आहे.आणि जीवनभर राहीन आणि म्हणून याचे नियम माहित करून घ्यायालाच हवे. आज आपण ग्रामसभेच्या बाबतीत महत्वाच्या गोष्टी सांगाव्यात.



मी या सभेच्या अध्यक्षा आणि पंचायतच्या सरपंच नर्मदाताई यांना विनंती करतो की ग्रामसभेचे महत्व या विषयी बोलावे

नर्मदा : सभेत उपस्थित असलेल्या बंधू भगिनी व मुलांनो ! स्वातंत्र्यानंतर ४७ वर्षे आमच्या देशातील लोकतंत्र केवळ नावाला होते. सरकारमध्ये जनतेचा काही सहभाग नव्हता त्याचे काम फक्त मतदान करणे होते. परंतु पंचायत राज्य कायदा तयार झाल्यानंतर ग्रामसभेला कायदेशीर मान्यता मिळाल्यामुळे नागरिकांना सरकार मध्ये पूर्णपणे सहभागी बनविले गेले. यामुळे गावाचा विकास गावकऱ्यांच्या आवश्यकना आणि इच्छेनुसारच नाही तर त्यांच्या निर्णयानेच होणार. परंतु आम्हाला विकास पाहिजे पण जबाबदारी नको. आता गावाचा विकास फक्त सरपंचाचीच जाबाबदारी नाही तर सर्व गावकऱ्यांची जबाबदारी आहे. मित्रांनो पूर्वी सरपंचाला गावाच्या सल्ल्यानुसार नव्हे पंचायत च्या सल्ल्यानुसारकाम करावे लागत होते. परंतु आता सरपंचाला ग्रामसभेच्या निर्णयावर काम करावे लागते. जेव्हा ग्रमसभा निर्णय घेणार नाही तेंव्हा एक तर गावाचा विकास होणार नाही किंवा सरपंच ग्रामसभा अकार्यक्षम दाखवून काम करून घेईल. जर सरपंच इमानदार असेल तर तो चांगले काम करेल परंतू जर ग्रामसभा जागृत असेल तर कोणालाही फसवता येणार नाही.

ग्रामसभा कायदेशीर संस्था आहे. तिला काही नियम कायदे वापरून काम करावे लागते. प्रत्येक ग्राम सभेच्या सचिवाचे कार्य असते. की पंचायत आणि ग्रामसभा प्रत्येक काम नियमानुसार करते किंवा नाही. आता मी सचिव साहेबांना विनंती करते की त्यांनी ग्रामसभेची उभारणी व कामकाज याबद्दलच्या कायदेशीर बाबी सर्वांना सांगाव्यात.

सचिव : ऐका ग्रामपंचायतीत जेवढी गावे आसतात, त्या प्रत्येकाची आप आपली स्वतंत्र्य ग्रामसभा असते. गावातले सर्व स्त्री पुरूष ज्यांनी वयाची १८ वर्ष पूर्ण केली आहेत ते आपल्या गावातील ग्रामसभेचे सदस्य आहेत. त्यांना ग्रामसभेत सहभागी होण्याचा, प्रस्ताव दाखल करण्याचा त्यासंदर्भात सल्ला–मसलत करण्याचा, प्रस्तावाचे समर्थन किंवा विरोध करण्याचा पूर्ण अधिकार आहे.

श्याम : ग्रामसभेची बैठक कधी बोलवतात ?

सचिव : ग्रामसभेचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च पर्यंत मानतात. याला वित्तीय वर्ष म्हणजे

हिशोबाचे वर्ष म्हणतात. ग्रामसभेची बैठक वर्षातून चार वेळेस म्हणजे दर तीन महिन्यांनी होणे आवश्यक आहे. अधिनियम ७ (२) क नुसार ग्रामसभेची वार्षिक बैठक ३१ मार्च पूर्वी डिसेंबर महिन्यात होणे आवश्यक आहे. यामध्ये पंचायतीचा वार्षिक हिशोब, मागील वित्तीय वर्षाचा प्रशासकीय रिपोर्ट, ऑडिट रिपोर्ट, ग्रामपंचायतीचे वार्षिक बजेट आणि पुढील वर्षातील कामाच्या अंमलबजावणीची माहिती ठेवली जाते. या व्यतीरिक्त जनपद पंचायत, जिल्हा पंचायत किंवा जिल्हाधिकारी यांनी ग्रामसभेच्या विचारार्थ एखादा विषय पाठविल्यास त्यावरही चर्चा केली जाते.

हबीब : जर एखाद्या समस्येवर तावडतोब चर्चा करून निर्णय घेणे आवश्यक असल्यास आपल्याला पुढील बैठकीची वाट पहावी लागेल?

नर्मदा : लोकांना वाटल्यास पंचायतीच्या सचिवांना बैठक बोलविण्या संदर्भात निवेदन देवू शकतात. निवेदन प्राप्त झाल्यानंतर सात दिवसांच्या आत बैठक बोलावणे आवश्यक आहे. परंतु निवेदनावर ग्रामसभेच्या किमान १० टक्के सदस्याचे हस्ताक्षर होणे आवश्यक आहे.

एक ग्रामीण :ग्रामसभेची बैठक कशा प्रकारे बोलावली जाते व तिचे कामकाज कशा प्रकारे चालविले जाते?

नर्मदा : बैठकीची सूचना बैठकीच्या तारखेच्या कमीत कमी एक आठवडा आधी सरपंचाद्वारे दिली जाते. हि सूचना प्रत्येक सदस्याला मिळावी यासाठी गावामध्ये दवंडी पिटवून किंवा पंचायतीच्या कार्यालयावर अथवा गावात मोक्याच्या ठिकाणी चिटकवली जावू शकते. प्रत्येक पंच आपआपल्या वार्डातील सदस्यांना सूचना देईल. बैठक नियमानुसार चालावी याकरिता जिल्हाधिकारी एक विशेष आधिकारी नियुक्त करतात. हे अधिकारी बैठक नियमानुसार चालविण्यास मदत करतात. ग्रामपंचायतीचा सरपंच ग्रामसभेचे अध्यक्ष असतात. सरपंच नसतांना उपसरपंच आणि दोन्ही नसतांना सगळया पंचाच्यासहमतीने एखादया पंचास अध्यक्ष करता येते.

सखूबाई : बैठकीत कोणत्या विषयावर चर्चा करता येते ?

नर्मदा : आपण सांगा ग्रामसभेत कोणत्या विषयावर चर्चा केली पाहिजे?

इकबाल : ग्रामसभेमध्ये गावातील समस्या आणि विषय जसे की, शेती, शेतकरी, पशुपालन, सिंचन, आणि पिण्याचे पाणी, मुलांचे शिक्षण, चारागृह, राशन कार्ड इ. विषयावर चर्चा होणे आवश्यक आहे.

एक विदयार्थी : ग्रामसभेत मुलांना व तरूणांच्या खेळण्याच्या मैदानावर चर्चा होऊ शकते काय ?

नर्मदा : ग्रामसभा गावातील आवश्यक बाबींवर व समस्यांवर चर्चा करून त्यावर योग्य तो उपाय शोधण्याचे काम करते. शेतीचा विकास भुमी सुधार, सिंचनाचे साधन, पशुपालन, कुक्कुट पालन, मत्स्यपालन, वनांशी संबंधित उदयोग, राहण्याची जागा,

पिण्याचे पाणी, जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्था, शिक्षण, साक्षरता, आरोग्य, परिवार कल्याण, धान्य वितरण, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, ग्रंथालय असे २९ विषय संविधानामध्ये दाखवले आहेत पंचायतराज आणि ग्रामस्वराज अधिनियमाध्ये ग्रामसभेच्या जबाबदारीवर एकूण साठ विषय सांगितले आहेत. आपण असे समजा की गावच्या विकासासाठी प्रत्येक आवश्यक विषयावर चर्चा केली जावू शकते.

श्याम : ग्रामसभेच्या बैठकीत कोणत्या विषयावर चर्चा करावी हे कोण ठरविते?

नर्मदा : बैठकीचा विषय सरपंचाच्या सल्याने ठरवितात. ग्रामसभेचा कोणताही मतदार कोणत्याही विषयावर चर्चा करण्यासाठी निवेदन देवू शकतो. बैठकीच्या वेळी अध्यक्षांच्या सहमतीने कोणताही विषय जोडता येवू शकतो.

हबीब : एखादया विषयावर निर्णय कशा प्रकारे घेतात?

नर्मदा : ग्रामसभेमध्ये कोणताही निर्णय घेतांना सर्वांची सहमती घ्यावी असा नियम आहे. जर एखादया विषयावर मतभेद झाले तर सर्व सहमती घेण्याचा प्रयत्न करावा सर्वसहमती न झाल्यास तो विषय पुढील बैठकीत ठेवावा. जर दोन बैठकीत सर्व सहमती न झाल्यास तिसरी बैठक बोलावली पाहिजे आणि त्यामध्ये गुप्तमतदान घेवून बहुमताच्या आधारावर निर्णय घेतला जातो.जर मतदानामध्ये दोन्ही बाजुने समान मते पडल्यास अध्यक्षांच्या मताने निर्णय होतो.

अनिसा बेगम शेजारील गावाच्या ग्रामसभेने त्यांच्या गावातील तलावात मत्स्यपालन करून जनावरांना पाणी पिण्यापासून रोखण्याचा निर्णय घेतला आहे. आपली जनावरे त्या गावात नेहमी पाणी पिण्यासाठी जातात. यामुळे दोन्ही  गावातील वाद वाढतील.


सचिव : जेंव्हा एखाद्या ग्रामसभेच्या निर्णयाचा परिणाम दुसऱ्या गावावर पडतो. आणि ते गाव त्या निर्णयावर सहमत नसेल तेंव्हा ग्रामपंचायतीची संयुक्त बैठक बोलविली जाते. त्यामध्ये जो निर्णय होईल तो सर्वांना मान्य करावा.

एक गावकरी: ग्रामसभेच्या निर्णयाचे व प्रस्तावाचे लिखाण कोण करतो?

नर्मदा : ग्रामपंचायतीचा सचिव ग्रामसभेच्या बैठकीची संपूर्ण कार्यवाही रजिस्टरमध्ये लिहितो. कार्यवाही सर्व सदस्यांना वाचून दाखविली जाते. त्यानंतर उपस्थित सदस्यांनी नावे लिहून त्यांची सही किंवा अंगठा घेतला जातो. ग्रामसभेच्या निर्णयाच्या व प्रस्तावाच्या प्रति ग्रामपंचायतीला देण्यात येतात. ग्रामपंचायत सर्व ग्रामसभेच्या प्रस्तावावर योजना तयार करून तालुका पंचायतीला पाठवतात व तालुका पंचायत त्यास जिल्हा पंचायतीला पाठवतात.

राम : ग्रामसभा गावातील कोणकोणत्या जबाबदाऱ्या पार पाडते?

नर्मदा : गावातील प्रत्येक विकासाची जबाबदारी ग्रामसभेची असते. म्हणून ग्रामसभेस आर्थिक व सामाजिक विकासाची योजना बनविण्याचा, अनुमोदन करण्याचा, विकासासाठी मंजूर केलेली कामे व्यवस्थित व्हावी यासाठी त्यांची पाहणी करण्याचा अधिकार आहे.



ग्रामसभा गावाच्या विकासासाठी त्यांच्या गरजा आणि उत्पन्न याचा अहवाल ग्रामपंचायतीला पाठवते. या आधारावर ग्रामपंचायत त्यास पुढील अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करते. ग्रामसभेची ही सुध्दा जबाबदारी आहे की, त्यांनी लक्ष ठेवावे शासकीय योजनेचा लाभ गावकरी, विशेषत : गरीबांना व्यवस्थित मिळतो किंवा नाही. ग्रामसभा गावातील जंगल,जमीन, पाणी, खदान आणि जैविक संपत्तीची देखभाल आणि त्याचा दुरूपयोग होण्यापासून बचाव करण्याचे काम करते.गावातील शासकीय व अशासकीय कामावर नजर ठेवते. या व्यतिरिक्त जनपद पंचायत आणि जिल्हा पंचायत आणि शासनद्वारे दिलेली कामे गावामध्ये साफसफाई ठेवणे, रस्ते व गल्लीमध्ये विद्युत दिव्यांची व्यवस्था करणे, कोंडवाडयाची व्यवस्था करणे, जन्म, मृत्यू व विवाह नोंदणीची माहिती ठेवण्याचे काम ग्रामसभेचे आहे. ग्रामसभेची जबाबदारी आहे की हुंडा, अस्पृश्यता, बालविवाह, स्त्रीभृण हत्या अशा कुप्रथा थांबविणे आणि गावात नवीन जन चेतना निर्माण करणे. गावात युवा कल्याण, परिवार कल्याण, तथा खेळ व संस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहन देणे ही ग्रामसभेची जबाबदारी आहे. ग्रामसभेस आपल्या क्षेत्रात काम करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांवर निगराणी ठेवणे, त्यांच्या सुटया मंजूर करणे इ.अधिकार आहेत. जर एखादा कर्मचारी, त्याच्या कामामध्ये बेजबाबदारपणा दाखवत आसल्यास त्यास दंड देण्याची शिफारस ग्रामसभा करू शकते.

गणपत : ग्रामसभेच्या कार्यक्षेत्रात कोणकोणते शासकीय कर्मचारी येतात?

नर्मदा : ग्रामसभेच्या कार्यक्षेत्रात कोतवाल, तलाठी, कृषिविस्तार अधिकारी, आरोग्यसेवक, अंगणवाडी कार्यकर्ता आणि प्राथमिक शिक्षक येतात. या सर्व कर्मचाऱ्यांवर ग्रामसभेचे नियंत्रण असते.

# ४. समित्या

रमजान : ग्रामसभा आपली कामे अंमलात कशा प्रकारे आणते?

नर्मदा : ग्रामसभा गावातील सर्व कामे दोन समित्यांच्या मदतीने करते.यामध्ये एका समितीचे नाव आहे "ग्रामनिर्माण समिती" व दुसरी "ग्रामविकास समिती'' ग्रामविकास समिती गावाच्या विकास कामासाठी योजना व अंदाजपत्रक तयार करते. ग्रामनिर्माण समिती ग्रामसभेमध्ये ठरल्याप्रमाणे सर्व निर्माण कार्य करण्याचे काम करते. कामाच्या प्रगतीचा आढावा ग्रामसभेस देते. सर्व निर्माण कार्याचे मुल्यांकन जिल्हाधिकारी किंवा जिल्हा पंचायत च्या एजन्सीद्वारे केले जातात. ही समिती ग्रामसभेच्या क्षेत्रामध्ये पाच लाखापर्यंत निर्माण कार्य करू शकते. या समित्या स्थायी असतात. यांच्या निर्मितीसाठी ग्रामपंचायतीचे सरपंच ग्रामसभेचे पहिले संम्मेलन बोलवितात. ग्रामसभेचे सदस्य आपल्यातीलच सर्वांच्या सहमतीने किंवा बहुमताने समितीचे एक–एक अध्यक्ष निवडतात. अध्यक्षाचा कार्यकाळ अडीच वर्षांचा असेल. ग्रामपंचायतीचा सरपंच कोणत्याही समितीचा अध्यक्ष राहणार नाही. प्रत्येक समितीमध्ये अध्यक्ष मिळून जास्तीत जास्त सहा सदस्य असतील.

रमजान : ग्रामविकास समिती काय काय काम करते?

नर्मदा : ग्रामनिर्माण समिती एक प्रकारची एजन्सी आहे. जी ग्रामसभेद्वारे अनुमोदित निर्माण कार्य करते. जसे शाळा, तलाव, रस्ता, धर्मशाळा इ. ग्रामसमिती फक्त पाच लाख रूपयापर्यंतच निर्माण कार्य करू शकते.

# ५. ग्रामकोष किंवा ग्रामपंचायत

ग्रामकोष

फुलाबाई: ग्रामसभेच्या विकासासाठी उत्पन्न कोठून येते?

नर्मदा : प्रत्येक ग्रामसभेचा एक ग्रामकोष असतो. ग्रामकोषाचे चार भाग असतात.

- पहिला वस्तुकोष ज्यामध्ये दगड, माती, मुरूम, लाकुड, सिमेंट, पुस्तके इ. जमा करतात.
- दुसरा अन्नकोष ज्यामध्ये धान्य एकत्रित केले जाते.
- तिसरा श्रमकोष ज्यामध्ये श्रमदानाची वेळ मोजली जाते.

- चौथा रोख कोष ज्यामध्ये ग्रामस्त्रोताद्वारे मिळालेले उत्पन्न किंवा पंचायत निधीमधून अनुदान जमा होईल. केंद्र किंवा राज्य सरकार गांवाच्या विकासासाठी किंवा योजनांसाठी ग्रामपंचायतीला अनुदान देतात. काही रक्कम कल्याण योजनेमध्ये विधवा, वृध्द, इ. साठी येते. हे अनुदान नियमानुसार ग्रामसभेच्या ग्रामकोषमध्ये जमा केले जाते.

ग्रामपंचायत

नानकीबाई: जर गावाची सर्व जबाबदारी ग्रामसभेची आहे, तर ग्रामपंचायतीची काय आवश्यकता आहे?

नर्मदा : ग्रामपंचायतीचे काम पूर्ण गावाच्या सहमतीने विकासासाठी निर्णय घेणे, त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी एका जबाबदार संस्थेच्या रूपात ग्रामपंचायतीची निर्मिती केली जाते.

एक ग्रामीण: ग्रामपंचायतिची निर्मिती कशी होते?

नर्मदा : ग्रामपंचायतीसाठी कमीत कमी एक हजार लोकसंख्या आवश्यक आहे. जर एखाद्या गावाची लोकसंख्या एक हजार पेक्षा कमी असेल, तर एकापेक्षा अधिक गावे मिळून ग्रामपंचायत केली जाते. पंचायतीसाठी कमीत कमी १० वॉर्डात विभागणी केली जाते. पंचायतीची लोकसंख्या जास्त असल्यास वॉर्डाची संख्याही जास्त असू शकते.

रमाबाई : ग्रामसभेच्या क्षेत्रात कोणकोणते शासकीय कर्मचारी येतात. ?

नर्मदा : परंतू एका ग्रामपंचायतमध्ये २० पेक्षा जास्त वॉर्ड राहू शकत नाही. वॉर्डाची विभागणी करतांना या गोष्टीचे लक्ष ठेवले जाते की प्रत्येक वॉर्डाची लोकसंख्या जवळ जवळ समान असेल. ग्रामपंचायतीसाठी प्रत्येक वॉर्डातून एक पंच आणि पूर्ण पंचायतीमधून एक सरपंच निवडला जातो. प्रत्येक वॉर्डाचे मतदार आपल्या वॉर्डातील पंचासाठी मतदान करतात. सरपंचाची निवड संपूर्ण ग्रामपंचायतीचे मतदार करतात.

श्याम : उपसरपंचासाठी तर मतदान होत नाही. त्याची निवड कशी केली जाते. ?

नर्मदा : ग्रामपंचायतीने निवडलेले सरपंच आणि प्रत्येक वॉर्डातील निवडलेले पंच आपल्यातीलच एकाला उपसरपंच म्हणून निवडतात.

# ६. ग्रामपंचायतीमध्ये पदांचे आरक्षण

विष्णू : यावेळेस पंचायतीमधुन सरपंच पदासाठी कोणी पुरूष उमेदवार निवडणूक का नाही लढला?

सचिव : यावेळेस या पंचायतीचे सरपंच पद हे महिलांसाठी राखीव होते.याप्रमाणे पंचायतीचे

१६ वार्डामधून ८ वॉर्ड पंचाची पदे महिलांसाठी राखीव असतात. जे पद महिलांसाठी राखीव असते त्या पदांवर पुरूष निवडणूक लढू शकत नाही. तरी पण नर्मदाजींना बिनविरोध सरपंच म्हणून निवडले गेले.

सखाराम: ग्रामपंचायतीच्या पदासाठी आरक्षण का असते?

नर्मदा : शासन चालविण्यासाठी कमजोर किंवा सामाजिकरित्या मागासलेले विशेषत : महिला सहभागी व्हाव्यात यासाठी आरक्षण दिले जाते. यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होवून त्यांच्या क्षमतेचा विकास होतो.

इकबाल: आरक्षणाचे नियम काय आहेत?

सचिव : आरक्षण जातीनुसार फक्त अनुसुचित जाती, जमाती आणि मागासलेल्या जातीच्या संख्येनुसार असते. इतर जातीसाठी कोणतेही आरक्षण नसते. ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येनुसार अनुसुचित जाती, जमाती आणि मागासलेल्या जातीचे जे प्रमाण असेल, त्या प्रमाणानुसार पंचाचे पद राखीव असेल. जर एखादया पंचायतीच्या एकूण लोकसंख्येपैकी अर्धी लोकसंख्या अनुसूचित जाती व जमातीची आहे आणि त्या गावात २० वॉर्ड आहेत, तर त्या गावातील १० वॉर्ड त्यांच्यासाठी राखीव असतील.

इकबाल: महिलांना किती आरक्षण मिळते?

सचिव : महिलांसाठी आरक्षित आणि विनाआरक्षित सर्व पदांवर अर्धी पदे आरक्षित असतात. म्हणून या पंचायतीमध्ये अनुसूचित जाती जनजातीच्या १० पदांपैकी ५ पदे त्याच जातीतील महिलांसाठी राखीव असतात. मागास जातीसाठी त्या पंचायतीमध्ये आरक्षण मिळते. ज्यामध्ये अनुसूचित जाती, जमातीचे एकूण लोक संख्येच्या अर्धी किंवा त्यापेक्षा कमी असते.

इकबाल: अनुसूचित जाती आणि जमातीसाठी आरक्षणाचे काय नियम आहेत?

सचिव : जर एखाद्या ग्रामपंचायतीमध्ये अनुसूचित जाती आणि जमातीची एकूण लोकसंख्या अर्ध्यापेक्षा कमी असेल तर त्यामध्ये एक चतुर्थांश पदे मागास जातीसाठी राखीव असतील. सामान्य पदावर कोणत्याही समाजाचे स्त्री किंवा पुरूष निवडणूक लढवू शकतात. सामान्य महिलांसाठी राखीव पदांवर अनुसूचित जाती व जमातीच्या महिलाही निवडणूक लढवू शकतात.

सुषमा : सरपंच पदाचे आरक्षण कसे ठरवतात?

नर्मदा : सरपंचपदाचे आरक्षण जनपद पंचायतीच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार होते. जनपद पंचायतीच्या एकूण लोकसंख्येमध्ये अनुसूचित जाती, जमाती आणि मागासलेल्या जाती यांचे जे प्रमाण असेल त्या प्रमाणानुसार पंचायतीचे सरपंच पद आरक्षित असेल. परंतु ज्या जनपदामध्ये अनुसूचित जाती, जमाती यांची एकूण लोकसंख्या अर्ध्यापेक्षा जास्त असल्यास त्यामध्ये मागास जातीसाठी सरपंच पद राखीव नसेल. जर अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या अर्ध्यापेक्षा कमी असेल तर

एकूण ग्रामपंचायतीचे सरपंचच्या एक चतुर्थांश सरपंच मागास जातीतील असतील. प्रत्येक वर्गामध्ये एकूण सरपंचाच्या अर्ध्या सरपंच महिला असतील.

हबीब : सरपंच किंवा उपसरपंच कोण बनू शकतो?

नर्मदा : सरपंच किंवा उपसरपंच बनण्यासाठी ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेचे सदस्य होणे आवश्यक आहे. जर एखादी व्यक्ती दिवाळखोर झाली, असेल व त्यावर पंचायतीची काही बाकी असेल त्याने पंचायतीच्या किंवा शासकीय जमिनीवर कब्जा केलेला असेल. मानसिकरित्या आजारी असेल, मंदबुध्दी किंवा कुष्ठरोगी असेल, नशेच्या संदर्भातील एखाद्या गुन्ह्यामध्ये दंड भोगलेला असेल, दिवाणी अधिकार संरक्षण अधिनियम १९९५ नुसार दोषी सिध्द झाला असेल, तो सरपंच किंवा उपसरपंच पदाची निवडणूक लढवू शकत नाही. एखाद्या गुन्ह्यामध्ये कमीत कमी ६ महिने शिक्षा उपभोगली असेल व शिक्षा उपभोगल्यानंतर पाच वर्षे झालेली नसतील अशी व्यक्ती सुध्दा निवडणूक लढवू शकत नाही.

हबीब : पंचायतीमध्ये कार्यरत कोणतीही व्यक्ती निवडणूक लढवू शकते काय?

नर्मदा : जर तो पंचायतीत एखादी नोकरी करत असेल, पंचायतीचा वकील म्हणून पगार घेत असेल, शासनाच्या अंतर्गत एखादया कंपनीमधून नोकरीवरून काढून टाकले असेल किंवा विधानसभेची निवडणूक लढण्यासाठी अयोग्य घोषित केले असेल तरी सुध्दा तो निवडणूक लढवू शकत नाही. जर तो एखाद्या दुसऱ्या देशाचे नागरिकत्व घेतलेला असेल, तरीही तो पंचायतीची निवडणूक लढवू शकत नाही.

इकबाल : ग्रामपंचायत कोण कोणते कामे करू शकते?

नर्मदा : ग्रामपंचायतीचे मुख्य काम म्हणजे आपल्या कार्यक्षेत्रातील जनतेच्या सोयी–सुविधांची व्यवस्था ठेवणे, ग्रामपंचायतीच्या संपत्तीचे रक्षण करणे, आणि प्राकृतिक साधनांची देखभाल व नियंत्रण करणे. यासाठी पंचायत क्षेत्रामध्ये घातक वस्तूंच्या व्यापारावर नियंत्रण आणू शकते. पंचायतीच्या विकासासाठी कोणतीही इमारत किंवा झाड हटवू शकते. त्यास सार्वजनिक संपत्तीवरून अतिक्रमण हाटविण्याचाही अधिकार आहे.

इकबाल : विकास कामासाठी संविधानामध्ये एखादा नियम तयार केला गेला आहे काय?

नर्मदा : विकास कामासाठी संविधानात एकूण २९ कामांची नियमावली दर्शविली आहे. ज्या संदर्भात ग्रामसभेचे कार्य सांगतांना आपल्याला सांगितले होते. त्या सर्व कामांची जबाबदारी पंचायतची आहे.

# ७. ग्रामपंचायतीच्या समित्या

जानकीबाई : पंचायत एवढी सगळी कामे अंमलात कशी आणते?

नर्मदा : ग्रामपंचायतीची सर्व कामे सरपंच आणि उपसरपंच मिळून आपसातल्या सहयोगाने कामे करतात. यासाठी तीन स्थायी समित्यांची स्थापना केली जाते. पाहिल्या समितीचे नाव प्रशासन समिती आहे. ही समिती व्यवस्था ठेवण्याचे काम पाहते.

जानकीबाई : दुसऱ्या समितीचे काय नाव आहे? आणि ती काय काम करते?

नर्मदा : दुसऱ्या समितीचे नाव "निर्माण आणि विकास समिती" आहे. ही समिती विकासाच्या योजना बनवते आणि सर्व निर्माण कार्याचे काम पाहते. तिसऱ्या समितीचे नाव "शिक्षण, आरोग्य आणि कल्याण समिती" आहे. ही समिती गावातील शिक्षण, आरोग्य आणि कल्याणासंबंधी कामे पाहतात.

सुमतीबाई: या समित्यांची स्थापना कशी होते?

नर्मदा : यांच्या स्थापनेसाठी पंचायतीचे विशेष सम्मेलन बोलवले जाते. सर्व पंच आपल्यातूनच या समित्यांच्या सदस्यांची निवड करतात. प्रत्येक समित्यांचे चार सदस्य असतात कोणताही पंच एकावेळेस दोनपेक्षा अधिक समित्यांचा सदस्य बनू शकत नाही. कोणत्याही समितीचे कामकाज व्यवस्थित चालावे याकरीता सदरील समिती अशा दोन सदस्यांची निवड करू शकते ज्यांचा अनुभव समितीच्या उपयोगी पडेल. परंतु या सदस्यांना कोणत्याही निर्णयावर मत देण्याचा अधिकार नसतो. उपसरपंच प्रत्येक समितीचा पदसिध्द सदस्य असतो. सरपंच तिन्ही समितीचा अध्यक्ष असतो. पंचायतीचे काम पाहणारा किंवा पंचायतीचा सचिव तिन्ही समितींचा सचिव असतो.

राम : या समित्यांची बैठक केंव्हा आणि कशी होते?

नर्मदा : बैठकीची तारीख समितीचा अध्यक्ष ठरवतो. बैठक महिन्यातून किमान एकदा तरी झालीच पाहिजे. बैठकीमध्ये किमान अर्धे सदस्य उपस्थित असल्यास बैठकीचा कोरम पूर्ण होतो. ग्रांमपंचायतीला वाटल्यास आणि गरज पडल्यास बैठकीसाठी शासकीय अधिकारी किंवा तज्ञ बोलवू शकते. बैठकीत बहुमताने निर्णय घेतला जातो.

रमजान : समिती झालेल्या निर्णयावर अंमलबजावणी कशी करते?

नर्मदा : सर्व समित्यांचे निर्णय सामान्य प्रशासन समिती ग्रांमपंचायतीच्या पुढच्या बैठकीमध्ये ठेवते. पंचायत त्यांना बहुमताने स्वीकारते किंवा पुनर्विचारासाठी परत पाठवू शकते. ग्रामपंचायतीमध्ये समितीचा निर्णय मंजूर झाल्यावर योजना

तयार करून काम सुरू होते. कामाच्या देखरेखीची जबाबदारी समितीची असते. जर काम व्यवस्थितपणे पार पडत नसेल तर समितीच्या तक्रारीवरून पंचायत योग्य ती कार्यवाही करते.

लक्ष्मी : पंचायतीचे सचिव काय काम करतात?

नर्मदा : सचिव हा ग्रामपंचायत, ग्रामसभा आणि सर्व समित्यांची प्रत्येक कामे, जसे बैठकींची सूचना देणे, त्यावर झालेल्या कार्यवाहीचे लिखाण करणे, तसेच हिशोब ठेवण्याचे प्रत्येक काम करतो. तो जनपद आणि जिल्हयाच्या पंचायतीमध्ये योग्य तो समन्वय ठेवण्याचे काम करतो. तसेच त्यांनी बैठकीला बोलवल्यास सहभागी होतो. पंचायतीचे कार्यालय वेळेवर उघडणे, आणि सर्व दस्तावेज व्यवस्थित ठेवणे हे सचिवांचे काम आहे. सचिवास पंचायतीच्या प्रत्येक नियमाची माहिती असणे आवश्यक आहे.



# ८. ग्रामपंचायतीच्या उत्पन्नांची साधने

राम — ग्रामपंचायतीस उत्पन्न कोठून प्राप्त होते?

नर्मदा — पंचायतींच्या उत्पन्नांचे प्रमुख साधन म्हणजे, पहिले साधन पंचायतीच्या कार्यक्षेत्रामध्ये भरणारे बाजार, मेळे, तसेच जनावरांची खरेदी–विक्री व्यवहार यावर पंचायत कर लावू शकते. तसेच पंचायत दान किंवा वर्गणीसुध्दा घेवू शकते. पंचायतीची संपत्ती म्हणजे इमारत, भाडे इ. भाडेतत्वावर देणे, आणि मुरूम, माती, वाळु इत्यादींच्या लिलावावर कर लावून आपले उत्पन्न वाढवू शकते. पंचायतीच्या उत्पन्नाचे दुसरे साधन म्हणजे केंद्र सरकार, राज्य सरकार, जनपद आणि जिल्हा पंचायत यांच्या विभिन्न योजनांद्वारे मिळणारे अनुदान आणि खासदार किंवा आमदार निधीतून मिळणारे उत्पन्न आहे. काही अशासकीय संस्थाही पंचायतीला मदत

करू शकतात.

श्याम — ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाचा हिशोब कसा ठेवला जातो?

नर्मदा — पंचायतीला जे काही उत्पन्न प्राप्त होते ते पंचायतीच्या निधीमध्ये जमा होते. पंचायतनिधिचा पैसा जवळच्या शासकीय कोषागारात, पोस्ट ऑफिस किंवा बॅंकेत जमा केला जातो. कोणत्याही कामासाठी ग्रामपंचायतीच्या प्रस्तावाने पैसे काढले जातात. पैसे सरपंच आणि सचिवांच्या सहीने काढले जातात. ज्या कामासाठी पैसे काढले जातात त्या कामाशी संबंधित पंचायतीची स्थायी समिती त्यावरील खर्चाची देखरेख करते आणि त्याचे संपूर्ण विवरण ग्रामसभेस देते.

अरूण : ग्रामपंचायतीस कसे माहित होते की, त्यांना किती रक्कम शासनाकडून मिळणार आहे आणि ती कशासाठी खर्च करावी?

नर्मदा : याची माहिती जनपद आणि जिल्हयाची पंचायत ग्रामपंचायतीस देते. त्या आधारावर ग्रामपंचायत कामांच्या योजना आणि खर्च याचे अंदाजपत्रक बनवते. अंदाजपत्रक बनवतांना पैसा ज्या योजनेकरीता प्राप्त झाला त्याच योजनेकरीता खर्च केला जाईल याची दक्षता घेतली जाते. जर एखादया कामाचा पैसा दुसऱ्या कामासाठी खर्च करावयाचा असेल तर तशी परवानगी संबंधित अधिकाऱ्यांकडून घ्यावी लागते.

इकबाल: ग्रामपंचायतीचा खर्च योग्य रीतीने होतो आहे किंवा नाही याबाबतीत कोण चौकशी करते?

सचिव : यासाठी ऑडीट केले जाते. ऑडीट हे दोन प्रकारचे असते. एक सामान्य ऑडीट जे दरवर्षी एप्रिल आणि ३१ मार्च दरम्यान होते. यासाठी शासन ऑडीटरची नियुक्ती करते. दुसरे विषेष ऑडीट असते, जे शासनद्वारा विशिष्ट वेळी केले जाते. ऑडीटच्या वेळी उत्पन्न आणि खर्चाची सर्व कागदपत्रे जसे कॅश बुक, व्हाऊचर बिले, रक्कम दिल्याची पावती, प्राप्त रकमेची पावती, बॅंकेचे पासबुक, चेक बुक किंवा त्यासंबंधीत दस्तावेज ऑडीटरला दाखवितात.

नर्मदा : आज भरपूर माहिती दिली गेली. एवढेच नाही तर आपल्याला सगळयांना मिळून गावाच्या विकासासाठी काम केले पाहिजे आणि प्रयत्न केला पाहिजे की, गावात कोणीही आजारी अथवा उपाशी राहू नये. कोणतेही लहान मूल कुपोषित राहु नये. कोणताही मुलगा विनाशाळेचा राहू नये किंवा निरक्षर राहू नये. आता मी आजच्या सभेचे मुख्य अतिथी व या क्षेत्रातील जनपद सदस्य आदरणीय मनोहर पाटील यांना विनंती करते की, त्यांनी जनपद आणि जिल्हा पंचायतीच्या बांधणीसंदर्भात थोडक्यात माहिती सांगावी.

# ९. जनपद आणि जिल्हा पंचायतची बांधणी

मनोहर पाटील: आधी मी आपण सर्वांना धन्यवाद देतो की, आपण आम्हाला निवडून देऊन आम्हाला जनपद सदस्य बनविले. जनपद पंचायतीची बांधणी विकास खंडावर आधारीत आहे. जनपद सदस्यांची संख्या विकासखंडाच्या संख्येनुसार ठरविली जाते.

गिरीजा : वॉर्डाची विभागणी कशी केली जाते?

मनोहर पाटील: ज्या विकासखंडाची संख्या ५० हजार किंवा त्या पेक्षा कमी आहे त्याची १० भागामध्ये विभागणी केली जाते. ५ हजार लोकसंख्या वर एक सदस्य निवडला जातो. परंतू एका विकास खंडाची जास्तीत जास्त २५ वॉर्डात विभागणी केली जाते. आमच्या विकासखंडाचे नाव श्रीरामपूर आहे ज्यात १५ वॉर्डाची विभागणी केली आहे. मला वॉर्ड क्र. ४ मधून निवडण्यात आले. एका जनपद पंचायतीचे सर्व सदस्य मिळून जनपद पंचायतचे संघटन केले जाते. पंचायतचा मुख्य जसा सरपंच असतो, तसेच जनपद पंचायतचा मुख्य जनपद अध्यक्ष असतो.

गिरीजा : आम्ही जनपद अध्यक्षपदासाठी मतदान दिले नव्हते. त्यांना कोणी निवडले?

मनोहर पाटील: जनपदचे सर्व सदस्य मिळून आपल्यामधील एकाला जनपदचे अध्यक्ष म्हणून निवडतात. याप्रकारेच जिल्हा पंचायतची बांधणी होते. जिल्हा पंचायत सदस्यांची संख्या जिल्ह्याच्या संख्येनुसार ठरविली जाते. ज्या जिल्ह्याची संख्या ५ हजार किंवा त्यापेक्षा कमी आहे त्या जिल्ह्याची कमीत कमी दहा वॉर्डात विभागणी केली जाते. अंदाजे ५० हजारच्या लोकसंख्येवर एक सदस्य निवडला जातो. परंतु एका जिल्ह्याची जास्तीत जास्त ३५ वार्डात विभागणी केली जाते. आपल्या जिल्ह्याची विभागणी २८ वॉर्डामध्ये केली आहे.

गिरीजा : जिल्हा पंचायतची बांधणी कशी होते?

मनोहर पाटील: जशी एका जनपद पंचायतचे सर्व सदस्य मिळून एक जनपद पंचायतची बांधणी होते. तशाच जिल्हा पंचायतचे सर्व सदस्य मिळून एका जिल्हा पंचायतची बांधणी होते. परंतु जिल्हा पंचायत मध्ये सदस्याबरोबर जिल्ह्याचे सर्व खासदार व आमदार आणि सर्व जनपद पंचायतीचे अध्यक्ष पण सदस्य असतात. जिल्हा पंचायतीचे सदस्य जिल्ह्याच्या सर्व वॉर्डातून निवडून आलेल्या सदस्यातून कोणा एकास पंचायतचा अध्यक्ष निवडतात.

धोंडू : जिल्हा पंचायत आणि जनपद पंचायत मध्ये आरक्षणाचे काय नियम आहेत?

मनोहर पाटील: जिल्हा आणि जनपद पंचायत मध्ये ग्रामपंचायत प्रमाणे अनुसूचित जाती जनजाती आणि मागासवर्गीय जातींच्या लोकसंख्येनुसार आरक्षणाचे नियम लागू असतात. प्रत्येक वर्गात अर्धी पदे महिलांसाठी राखीव असतात.

नर्मदा : आदिवासी क्षेत्रात लोक, कित्येक तटे लहान लहान टोळ्यांमध्ये बैठका घेऊन जुन्या रितीरिवाजाप्रमाणे तडजोड करुन मिटवतात. पंचायतीच्या कायद्यात पूर्ण गावाच्या बैठकीचा नियम आहे, त्यामुळे ग्रामसभेच्या बैठकीत अडचण येत होती.


सचिव : आदिवासी क्षेत्रात आदिवासींना आपल्या रितीरिवाजाप्रमाणे काम करता यावे त्यासाठी पंचायत विस्तार अधिनियम अंमलात आणला होता. जेथे आदिवासी संख्या जास्त होती तेथे हा आधिनियम अंमलात येत होता, त्यासाठी जास्त आदिवासी संख्या असणाऱ्या विभागास सरकारने आरक्षित केले आहे.

सखाराम : पंचायत विस्तार अधिनियमामुळे आदिवासींना काय सुविधा मिळते?

नर्मदा : अधिनियमामध्ये लहान टोळ्यांना पण ग्रामसभेचा दर्जा दिला गेला आहे. त्यांची परपंरा तसेच रितीरिवाजाप्रमाणे निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत.

सखाराम : अध्यक्ष महोदय आम्हाला पंचायत विस्तार अधिनियमबदल अधिक माहिती पाहिजे. आज खूप उशीर झाला आहे. माझं असं म्हणणं आहे की, दुसऱ्या एखाद्या दिवशी बैठक बोलावून त्याबाबत सर्व सदस्यांना माहिती द्यावी.

नर्मदा : नियम कायदा कळण्यास वेळ लागतो. एका दिवसात सर्व माहिती दिल्याने जास्त काही लक्षात राहणार नाही. म्हणून पुढच्या ग्रामसभेत ग्रामविस्तार अधिनियमाबाबत चर्चा करणे उचित राहील. आपण लोकांनी लक्ष देऊन पंचायत राज बाबत माहिती घेतली. आता ही सभा समाप्त करण्यात येत आहे. सर्वांना खूप–खूप धन्यवाद.



# १०. पंचायत उपबंध (अनुसूचित विभागाच्या विस्तारावर पेसा अधिनियम १९९६)

इंग्रजांनी भारताच्या खुल्या मैदानांवर व जागांवर कित्येक वर्षे राज्य केले. जंगलापर्यंत पोहोचण्याचे व जाण्या–येण्याकरण्याचे साधन नसल्यामुळे ते आदिवासी लोंकावर राज्य करु शकले नाही. जंगलात आदिवासी आपल्या पध्दतीने स्वत:चा कायदा अमंलात आणायचे. इंग्रजांनी त्यांना अपवर्जित क्षेत्र घोषित केले. इंग्रजांच्या काळातच या क्षेत्रास संविधानात पाचवी आणि सहावी अनुसूची तयार करण्यात आली. यामध्ये सहाव्या अनुसूचीमध्ये उत्तर पूर्व भारतातल्या आदिवासी लोकांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. उत्तर पूर्व भाग सोडून इतर भागामध्ये अपवर्जित क्षेत्र म्हणून त्यास अनुसूचित क्षेत्र असे नाव देण्यात आले.

सखाराम: स्वतंत्र भारतामध्ये अनुसूचित क्षेत्र कोण घोषित करते?

नर्मदा : भारताचे राष्ट्रपती अनुसूचित क्षेत्र घोषित करतात. देशाच्या ९ राज्यामध्ये आदिवासी क्षेत्रे घोषित करण्यात आली आहेत. ती ही आहेत – आंध्रप्रदेश, ओरीसा, गुजरात, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, छत्तीसगढ, झारखंड, राजस्थान आणि हिमाचल प्रदेश.

सखाराम: कोणती अनुसूची आदिवासी हिताचे रक्षण करते?

नर्मदा : पाचवी अनुसूची आदिवासींचे कवच आहे. त्यात शांती आणि सुशासन सुनिश्चित करण्यासाठी राज्याचे राज्यपाल यांना विशेष अधिकार देण्यात आलेले आहेत.

सखाराम: पेसा कायदा काय आहे?

नर्मदा : आदिवासी क्षेत्रात देशाचा सामान्य कायदा लागू झाल्याने आदिवासींच्या समाजात आणि त्यांच्या परंपराच्या रक्षणासाठी कोणताही प्रावधान उरला नव्हता. संविधात सुध्दा त्यासाठी काही सुधारणा नव्हती. अशा परिस्थितीत अनुसूचित क्षेत्रात राहणाऱ्या लोकांसाठी एका कायदयाची आवश्यता होती. अनुसूचित क्षेत्रासाठी "पेसा" एक सरळ परंतु व्यापक कायदा आहे जो अनुसूचित क्षेत्रामधील गावांना आपल्या क्षेत्रातील कार्य व व्यवहारांवर नियंत्रण ठेवण्याची शक्ती देत आहे.

सखाराम: अनुसूचित क्षेत्रामध्ये स्वशासनाचे मूळ सिध्दांत काय आहेत?

नर्मदा : आदिवासींच्या जीवनात परपंरागत कायदा सामाजिक आणि धार्मिक प्रथा तसेच सामुदायिक सामुग्रीच्या परंपरेसंदर्भात प्रबंधन केंद्रीय भूमिका करते.

सखाराम: आदिवासीच्या हितासंबधी ग्रामसभा काय भूमिका घेते?

नर्मदा : ग्रामसभा लोकांची परंपरा तसेच रितीरिवाज त्यांची सांस्कृतिक ओळख सामाजिक संसाधने अथवा विवाद निवारण्याच्या परंपरागत पध्दतीस संरक्षण देण्यास समर्थ आहे.

सखाराम: ग्रामसभेची बैठक कधी होते?

नर्मदा : ग्रामसभेची बैठक कमीत कमी तीन महिन्यात एकदा म्हणजेच वर्षातून चार बैठका आयोजित करणे अनिवार्य असेल. निर्धारित तिथी खालीलप्रमाणे आहेत.

दिनांक २३ जानेवारी पासून आरंभ सप्ताह

दिनांक १४ एप्रिल पासून आरंभ सप्ताह

दिनांक २० ऑगस्ट पासून आरंभ सप्ताह

दिनांक २ आक्टोबर पासून आरंभ सप्ताह

जर आवश्यकता असेल तर ग्रामसभेच्या सदस्यांच्या एकूण संख्येच्या एकतृतीयांश सदस्य लिखित किंवा सहीयुक्त निवेदन जनपद पंचायत किंवा जिल्हाधिकाऱ्यांना देतात. निवेदनाच्या ३० दिवसांच्या आत ग्रामसभा बोलवली जाते.

सखाराम: ग्रामसभेच्या बैठकीची सूचना ग्रामस्थांना किती दिवस आधी दिली जाते?

नर्मदा : ग्रामसभेच्या बैठकीची सूचना बैठकीच्या तारखेपासून कमीत कमी सात दिवस अगोदर दिली जाते.

सखाराम: ग्रामसभेच्या बैठकीचा अध्यक्ष कोण असतो?

नर्मदा : कोणीही निवडून आलेला जनप्रतिनिधी, सरपंच, पंच, अनुसुचित क्षेत्रामध्ये बैठकीचे अध्यक्ष होऊ शकत नाही. ग्रामसभेमध्ये बैठकीच्या अध्यक्षपदासाठी उपस्थित असलेल्या सदस्यांमधून अनुसूचित जनजातीच्या व्यक्तीला बैठकीचा अध्यक्ष ठरवावा लागतो.

सखाराम: ग्रामसभेची शक्ती आणि कार्य काय आहे?

नर्मदा : ग्रामसभेची शक्ती आणि कार्य खालीलप्रमाणे आहेत –

- गावाच्या प्रगतीसाठी कोणकोणती योजना लागू करावयाची आहे हे ठरविणे आणि त्यापैकी कोणती योजना आधी लागू करायची यासाठी प्राथमिकता देणे.
- ग्रामपंचायत तर्फे योजना लागू करण्याआधी त्यांना मंजुरी देणे.
- मंजुर केलेल्या योजनांवर योग्य प्रकारे कार्य होत आहे की नाही हे पहाणे आणि कार्य प्रमाणित करणे.
- ग्रामपंचायतीच्या वार्षिक अंदाजपत्रकावर विचार व चर्चा करणे.

- ग्रामपंचायतीचे वार्षिक खाते व त्या खात्याच्या आडीट वर विचार करणे.
- गरीबी हटवणे व इतर सरकारी कार्यक्रमांचा फायदा कोणत्या लोकांना मिळाला पाहिजे हे पाहणे.
- ग्रामपंचायतीना सोपवलेली सामाजिक संस्थावर पंचायतीदुवारे नियंत्रण ठेवणे
- गावाच्या क्षेत्रातील जमीन, पाणी, वन,खदान, यांची नियमा प्रमाणे देखरेख करणे.



- तलावाचे उपयोग आणि त्यांची व्यवस्था बाबत ग्रामपंचायतीला सल्ला देणे
- स्थानिक योजनासाठी पैसा कोठून येतो आणि कशाप्रकारे खर्च होतो यावर नियंत्रण ठेवणे.
- जर जनपद आणि जिल्हा पंचायत ग्रामपंचायतीला काही काम सोपवते तर तेही ग्रामसभेसमोर विचारासाठी दाखल केले जाईल.
- जरी सरकार जिल्हाधिकारी किंवा दुसऱ्या अन्य आधिकारी मार्फत पंचायतला काही काम सोपवित आहे तर तेही ग्रामसभेच्या बैठकीमध्ये विचारासाठी दाखल केले जाईल.

सखाराम: ग्रामसभेस कोणते आधिकार प्राप्त आहेत?

नर्मदा : ग्रामसभेस खालील आधिकार प्राप्त आहेत –

- सामाजिक तथा आर्थिक विकासाची विकासात्मक योजना, कार्यक्रम किंवा परियोजनास अनुमोदन संबंधी शक्ती देते.
- गरीबी निर्मूलन व अन्य कार्यक्रमासाठी लाभार्थीची ओळख आणि निवडीचे आधिकार
- पंचायत तर्फे लागू केलेल्या योजना, कार्यक्रम तसेच परियोजनासाठी उपयोगिता प्रमाणपत्र जारी करणे संबधी अधिकार

सखाराम: उपयुक्त स्तरावर पंचायतला काय आधिकार प्राप्त आहे?

नर्मदा : लघुजल प्रकल्प योजना बनविणे तथा प्रबंधनाचे आधिकार पंचायतीला आहे.

सखाराम: ग्रामसभा किंवा उपयुक्त स्तरावर पंचायतीचे काय आधिकार आहेत ?

नर्मदा : विकास परियोजनासाठी भूमी अधिग्रहण आणि सदर परियोजनामुळे प्रभावित झालेल्या

व्यक्तींचे पुनर्वसन व पुनर्विस्थापनेसाठी विचार–विनिमय करणे. गोण खजिण्यासाठी सर्वेक्षण परवाना किंवा खोदणी परवाना देण्यासाठी शिफारस आणि लिलावद्वारे गोण खणिज योजनासाठी खोदकामाचे अनुदान देणे.

सखाराम: अनुसूचित क्षेत्रामध्ये ग्रामसभेचे अधिकार आणि कार्य काय आहेत.

नर्मदा : कोणत्याही अनुसूचित क्षेत्रात ग्रामसभेची धारा सात चे आधिन प्राप्त अधिकार आणि कार्य अतिरिक्त खालील अधिकार तथा कार्य पण असतील जसे –

- मद्यनिषेध प्रवर्तित करणे किंवा कोणत्याही मादक द्रव्याची विक्री आणि उपयोगास प्रतिबंध करण्याचे अधिकार
- खनिज व वनसंपत्तीचा मालकी हक्क
- वनवासियांची परंपरा, सांस्कृतिक ओळख, सामाजिक साधनसंपत्ती आणि विवादांच्या निराकरणाच्या परंपरागत पध्दतीला सुरक्षित करणे
- बाजार आणि यात्रा ज्यामध्ये पशु बाजार ही आहे जे कोणत्याही नावाने ओळखले जाते त्यास ग्रामपंचायतमार्फत निर्बंध लावणे.
- अनुसूचित जनजातीयांना कर्ज देणे व नियंत्रण ठेवण्याचे अधिकार
- सर्व सामाजिक क्षेत्रामधील संस्था आणि कार्यकर्त्यांवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार
- गावाच्या सिमेच्या आत असलेल्या नैसर्गिक संपत्ती ज्यामध्ये भुमी, जल, आणि वने येतात. त्या परंपरानुसार आणि संविधानाचे उपबंधन अनुरूप प्रबंध करणे
- स्थानिक योजना ज्यामध्ये जनजातीस उपयोजना पण आहेत अशा योजनेसाठी क्षेत्र आणि व्यवस्थेवर नियंत्रण ठेवणे.
- राज्यसरकार मार्फत काही कायद्याअंतर्गत ग्रामसभेला दिलेले अधिकार आणि नियमाचे पालन करणे

सखाराम: पेसा कायद्याची सर्वात महत्वपूर्ण बाब काय आहे?

नर्मदा : पेसा कायद्यामध्ये असे मानण्यात आले आहे की ग्रामसभेच्या रूपामध्ये गाव आपली संपूर्ण व्यवस्था पाहण्यास सक्षम आहे. या बाबीची संविधानामध्ये नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे आता

- पाणी, वन, जमीन ही सर्व साधने गावाची संपत्ती आहे. शासन सुध्दा त्यांच्या परवानगीशिवाय त्याला हात देखील लावू शकत नाही. विकासाची नाळ आता गावसमाजाच्या हातात आहे. पैसा बाजार आणि कर्ज यावर नियंत्रण ठेवणे त्याचे काम आहे. सगळ्या वादांचे निराकरण करणे आणि दारूगिरी सहीत सर्व प्रकारची भांडणे मूळापासून मिटविणे ही त्यांची जबाबदारी आहे. प्रत्येक प्रकारची संस्था

त्याचे कर्मचारी अथवा कार्यकर्ते आणि पंचायतीचे पंच आणि सरपंच यांच्यावरही त्यांचे नियत्रंण असते.

- पेसा कायदयामध्ये ग्रामसभा सर्वात वरती आहे. ग्रामसभेच्या अधिकार क्षेत्रात संसद किंवा कोणीही दखल देवू शकत नाही. कारण सत्ता आता लोकांच्या हाती आहे. ही कायदेशीर संकटात सापडलेल्या अनुसूचित क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासी किंवा मानवीय सभ्यतेचे व संस्कृतीचे संरक्षण करते.

# ११. मत्स्यव्यवसाय करणारे किंवा कचरा वेचणा-यांचे अधिकार

मत्स्यव्यवसाय करणाऱ्यांचे आधिकार

कायद्याच्या आधारावर मत्स्यव्यवसाय करणाऱ्यांना दोन प्रकारे पाहिले जाते. एक जे मोठ्या जहाजाने मासेमारी करतात आणि दुसरे ते जे छोट्या जहाजाने किंवा पाण्यामध्ये जाळे टाकून मासेमारी करतात. हे मत्स्यव्यवसाय करणारे मच्छीमार समुद्रावर व लहान नदयांवर अवलंबून आहेत.

छोट्या स्तरावर मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांना "गळ टाकणारे" किंवा "पगडिया फिशरमेन" असे संबोधले जाते. कारण ते आपल्या गावापासुन कोसोदूर खाडीमध्ये मासेमारी करण्यासाठी जातात. ज्या कायद्यानुसार मच्छीमारांना संरक्षण दिले जाते. त्याचेच नाव सी. आर. झेड. नोटीफिकेशन २०११ (कोस्टल रेग्यूलेशन झोन नोटीफिकेशन ) असे आहे. सी.आर.झेड च्या अंतर्गत मच्छीमारांना खालील अधिकार आहेत.

- त्यांना देण्यात आलेली जागा कोणत्याही विकास योजनेअंतर्गत घेता येणार नाही.
- मच्छीमारांना समुद्रामध्ये जाण्यासाठी जो रस्ता आहे व जेथे ती आपली नांव बांधतात (क्रिक) कोणत्याही विकास परियोजनेच्या अंतर्गत बंद करू शकणार नाहीत.
- मैनग्रोवची झाडे ज्यामध्ये मासे अंडी घालतात ती नष्ट करता येत नाही.
- मासेमाऱ्यांना समुद्रामध्ये जाण्याचा रस्ता रोखला जावू शकणार नाही. काही कारणासाठी त्यांच्या पारंपारिक रस्त्यांमध्ये व्यत्यय आला तर त्यांना दुसऱ्या जागी पुनर्स्थापित केले जाईल.
- मासेमाऱ्यांचे पुर्नस्थापन त्यांच्या सहमतीनेच होऊ शकते.

## कचरा वेचणाऱ्यांचे अधिकार

समाजातील मागास वर्ग व कनिष्ट दर्जाचे काम करणाऱ्याना संविधानाच्या अनुच्छेद २१ अंतर्गत सर्व मानवीय अधिकार देण्यात आलेले आहेत. या व्यतिरिक्त एनवायरमेंट प्रोटेक्शन ॲक्ट अंतर्गत प्लास्टिक नियमाने कचरा वेचणारे विशेषत: पोलीथीन वेचणाऱ्यांना खालील अधिकार देण्यात आलेले आहेत.

- पोलीथीन गोळा करणाऱ्यांना सरकार (राज्य) कडून मदत केली जाते.
- त्याचे दायित्व नगरपालिका अथवा नगर परिषद यांचे आहेत.
- जो संघ किंवा जे लोक कचरा वेचतात त्यांना ओळखून त्यांना
- रोजगार देणे नगरपरिषद अथवा जिल्हा परिषद किंवा ब्लॉक पंचायतचे कार्य आहे.
- पंचायतला आदेश दिले गेले आहेत की अशा कार्यक्रमासाठी "सहाय्यता केंद्र" चालू करा.
- कचरा वेचणाऱ्यांना (वेस्ट टू एनर्जी प्लांट ) लावल्यामुळे जे नुकसान झाले आहे त्याची भरपाई सरकार करेल. ज्या विभागामध्ये वेस्ट टू एनर्जी प्लांट लावण्यात आलेले आहेत त्या विभागातील कचरा वेचणाऱ्यांना अधिकार आहेत की ते सरकारला नुकसान भरपाई मागु शकतात.

न्याय सब के लिए

ACCESS TO JUSTICE FOR ALL

दुर्बल घटक वा असो उत्पन्न कमी ।
प्राधिकरण देते विधी सेवेची हमी ।।

विधी सेवा प्राधिकरण योजना जिथे जिथे ।
अन्यायास वाचा फुटेल तिथे तिथे ।।

समजुन घ्या लोकन्यायालयाचे मोल ।
साधते ते जीवनात समतोल ।।

साधता संवाद ।
संपतो वाद ।।

भांडाणापेक्षा समझोता बरा ।
मिळेल त्यातच आनंद खरा ।।


**महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई**

१०५, उच्च न्यायालय (पी.डब्ल्यू.डी.) इमारत, फोर्ट, मुंबई ४०० ०३२

वेबसाईट : legalservices.maharashtra.gov.in • ई-मेल : mslsa-bhc@nic.in

फोन : (०२२) २२६९१३९५ / २२६९१५८६६ / (०२२) २२६९१३५८ • फॅक्स : (०२२) २२६७४२६५